८०२
काव्य.

दुर्मिळ ४०२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
( ठाणें जिल्हा वाचनालय ) वाचनालय/संदर्भ
काव्य - दुर्मिळ ४०२
कांचनगंगा

वाचनालयातील बाहेर
दुर्मिळ ४०२

नं. ३९३
ता. ८-४-३०

रविकिरणमण्डळाचें १६ वें पुस्तक

# काञ्चनगङ्गा

[ निवडक स्फुट कविता ]

महाराष्ट्र-साहित्य-परिषद.
परीक्षा वर्ग, केंद्र आणें.
20.

गिरीश

[ सभासद, रविकिरणमण्डळ ]

१९३०

किम्मत १॥ रुपया

प्रकाशक :
शङ्कर केशव कानेटकर
रविकिरणमण्डळ, ४६१ शनवार, पुणें २.

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ]

मुद्रक :
सीताराम वासुदेव फडणीस, बी. ए.,
'आर्यसंस्कृति-मुद्रणालय'
१९८ (१७) सदाशिव पेठ, चिमणबाग, टिळकरस्ता, पुणें.

प्रिय पत्नीस

# काञ्चनगङ्गा

# गिरीशकृत पुस्तकें

## अभागी कमल

[ आवृत्ति दुसरी ]

...... "हें काव्य हृदयंगम आहे. विधवेच्या करुण कहाणीचें चित्र अंतरंगात उठविण्याचें सामर्थ्य त्याच्यात आहे. त्यातले कांहीं भाग तर मनाला चटका लावून सोडणारे आहेत. भाषा सुबोध असून वाचतां वाचतां अर्थ मनात उतरला जातो. वर्णनात अतिशयोक्ति आहे तथापि वस्तुस्थितीची जाणीव करून देऊन मनात तळमळ उत्पन्न करण्यास तिची मदत होईल".......

—प्रो. धोंडो केशव कर्वे, बी. ए.

## कला

......"अभागी कमल या लोकप्रिय काव्याप्रमाणेंच या काव्याची रचनाहि सफाईदार व सौष्ठवपूर्ण आहे...नायकनायिकेच्या सौंदर्यप्रेमापेक्षां त्यांच्या परस्पर प्रेमाचेंच चित्र या काव्यांत अधिक तन्मयतेनें रेखाटलेलें आहे...एक कथन काव्य या दृष्टीनें हें काव्य निःसंशय सुंदर असून, प्रेमी जीवांच्या निराशेचें यांत केलेलें वर्णनहि हृदयंगम आहे. गिरीशांचे शब्द नेहमींच रेशमाच्या धाग्यासारखे पीळदार पण नाजुक असतात."...

—महाराष्ट्र, नागपूर.

## आम्बराई

......"सामाजिक व राजकीय दृष्ट्या खालच्या वर्गातील लोकांची उन्नति जेव्हां होईल तेव्हां होवो, नाटकें व कादंबऱ्या यांच्या क्षेत्रांत तरी त्यांचें यांना योग्य हक्क ज्या दिवशीं मिळतील तो ललित वाङ्मयाच्या दृष्टीनें सुदिनच म्हणावा लागेल. येथें नमूद करण्यास आनंद वाटतो कीं 'गिरीश' यांच्या 'आम्बराई' काव्यांत, खरे खालच्या वर्गातील लोक, त्यांचीं खरीं सुखदुःखें, त्यांचे खरे विचार, त्यांची खरी भाषा इत्यादिकांची ओळख पटते."

प्रो. वा. म. जोशी, एम्. ए. (वि. विस्तार)

ग्रं.क्र.नं. ३८५
ता. ८-७-३०

# प्रस्तावना

हा काव्यसङ्ग्रह रविकिरणमण्डळाचें सोळावें पुस्तक म्हणून प्रसिद्ध होत आहे. यांत मीं आपलीं निवडक स्फुट भावगीतें एकत्रित केलीं आहेत. त्यांचा अनुक्रम लावतांना मात्र विषयानुरूप लावलेला आहे. विषय व रचना यांच्या वैशिष्ट्यामुळें मराठी भावगीतांच्या अन्तर्बाह्य स्वरूपांत जरी वेळोवेळीं फरक होत गेला असला, तरी भावगीत हा काव्यप्रकार मराठीला नवीन नाहीं. ज्ञानेश्वरापासून मोरोपन्तापर्यन्त जी अभङ्गपदादि लघुकाव्यरचना झाली, ती भावगीत-स्वरूपाचीच असून, भक्तिरस हा तिचा आत्मा आहे; नन्तरच्या शाहीर कवींनीं रचलेल्या भावगीतांत शृङ्गार व वीर या रसांचा उठाव झालेला आहे; व केशवसुतापासून पुढे इङ्ग्रजी धर्तीची रचना सुरू होऊन, तिनें अनेक विषय व्यापलेले आहेत. या सङ्ग्रहांतील भावगीतांत वरील तिन्ही परम्परांतील तऱ्हा वाचकांना आढळतील. मात्र काही निव्वळ आत्मलक्षी, तर काही निव्वळ नाट्यात्मक, तर काहि दोहींचें मिश्रण, अशीं आहेत.

या कवितासङ्ग्रहास 'काञ्चनगङ्गा' हें नांव कां दिलें? केवळ माझ्या एका स्नेह्याची इच्छा म्हणून व त्यांत नांवाचीच का होईना जादू आहे म्हणून. कीस काढून सौन्दर्याची प्रतीति होत नाहीं; तथापि नांवाचाच कीस काढीत बसणारांस, शेवटीं दिलेल्या 'अर्घ्य-दान' कवितेंतील अर्थाकडे लक्ष देण्याविषयीं मी नम्र विनन्ति करतों.

यन्दा हें पुस्तक निघूं शकलें, याचें श्रेय मुद्रकांस व माझे विद्यार्थि-मित्र श्री. गोपीनाथ गणेश तळवलकर यांस आहे. पण आपुलकी-मुळें या बाबतींतलें हार्द न बोललेलेंच बरें.

१५ मार्च १९३० पुणें

गिरीश

# अनुक्रमणिका


| विषय | | पानें |
|---|---|---|
| १ वन्दनात्मक | ... | ... १... २ |
| २ सङ्कीर्ण | ... | ... ३... ९ |
| ३ बालगीतें | ... | ... १०... ११ |
| ४ व्यक्तीप्रत व स्थळाप्रत | | ... १२... ४४ |
| ५ वीरगीतें व जानपदगीतें | | ... ४५... ५२ |
| ६ सामाजिक | ... | ... ५३... ३२ |
| ७ प्रेमविषयक | ... | ... ६३...८६ व १४३ |
| ८ विडम्बनात्मक | ... | ... ८९... ९१ |
| ९ तात्विक | ... | ... ९५...१०६ |
| १० अभङ्ग | ... | ... ९२-...१२१ व १४१ |
| ११ कथात्मक | ... | ...१२२...१४४ |


## टीपा व शुद्धिपत्र

| पान | ओळ | |
|---|---|---|
| १३ | १३ | 'पावोनी सहवास, एकपण जें भक्तीमधे लाभलें, लाभो तें;' |
| ४१ | १४ | 'हृन्मन्दिरिं' असें वाचावें |
| ४६ | ५ | श्रीरङ्ग बद्दल रसरङ्ग वाचावें. |
| ५६ | ४ | आत्मवृत्त–प्रो. धो. के. कर्वेकृत आत्मचरित्र. |
| ७८ | ५ | आतर—नावेंतून जाण्याबद्दल द्यावें लागणारें भाडें. |
| ८४ | ११ | 'दरवळला' असें वाचावें. |
| ९१ | १ | प्र. प्र.—प्रसिद्ध प्रस्तावनाकार. |
| १२ | ७५ | उतारांत—स्टेशनांत |

# काञ्चनगङ्गा

## १ विश्वकमल

[ राग–असावरी, त्रिताल ]

मधुर तुझे प्रभु चरण नमावे
नाम तुझें कवनीं गावें ॥ ध्रु० ॥

विश्वकमल हें सहज उमललें
तव रूपाचे पराग फुलले
प्रेममरन्दें सुरुचिर भरले
जीवभृङ्ग तेथे धावे

निःस्वार्थानें मरन्दपानीं
रत होउनि तो दिवसयामिनी
तव रूपाचे अणु होवोनी
मुक्तिपदातें मग पावे

मे १९२० पुणें

# २ श्रीशारदावन्दन

[ वृत्त–मन्दारमाला ]

छाया तरूंच्या किती रङ्गलेल्या तुझ्या भोवती थाटुनी राहती
स्वर्गांतुनी पाझरे तेज खाली, फुलें पर्णराजी, तृणें नाहतीं
तीरीं शिळेच्यावरी भव्य मूर्ती तुझी शुभ्रवस्त्राङ्किता हासते
वीणा मृदु स्पर्शनें छेडुनी ही तरङ्गावली अङ्गुली निर्मिते
देवी ! तुझ्या दिव्य आलोकनाची शरच्चन्द्रिका त्यावरी नाचते
चैतन्य सञ्चारुनी अन्तरङ्गीं जडांना तुझी दिव्यता लाभते
नाचे तुझ्या गोड झङ्कारगानावरी ताल देऊन मन्दाकिनी
नाचे तरङ्गांतुनी गुङ्गलेली मुदें खालती मन्द कल्लोलिनी
वायू तुझ्या मञ्जु गुञ्जारवानें इथे मोहुनी सारखा थाम्बतो
कादम्बिनीखण्ड हा अन्तराळीं तुझ्या प्रेरणेनेंच आन्दोलतो
ध्यानस्थ झालें तुझ्या आदिरूपामधें विश्व हें गायनीं डोलुनी
संसारदुक्खामधें पोळलेले इथे बैसती अन्तरें खोलुनी
ओवी-अभङ्गाजलि-श्लोक-आर्यामुखांनीं तुला आळवीलें कुणी
माते ! कृपावृष्टि केलीस त्यांच्या मनोभूवरी आर्तगी ऐकुनी
मी दीन, मी लीन; तेथे कशाला बरें अल्पधीनें उभें राहणें ?
ध्यावें तुझें ध्यान येथून, आई ! इथूनी तुला भक्तिनें वन्दणें
जीवा हवें तें कुठे सापडेना, म्हणूनी तुझ्या रङ्गलों चिन्तनीं
माते ! मनःशान्ततेची सुधा या जिवा पाजवी गीतगङ्गेतुनी
निःस्वार्थतेनें तुझे शब्दबिन्दू असे साठवूनी सदा अन्तरीं
सोडीन एके दिनीं काञ्चनाची शिरांतून गङ्गा गिरीशापरी

१४ फेब्रुवारी १९२५ पुणें

सं. क्रमां. ३५६
ता. ८-५-३०

## ३ सारङ्गीवाला

[एक सारङ्गीवाला याचक, रात्रीं निजानीज झाल्यावर, अन्धारांतून एकटाच सारङ्गी वाजवीत चालला असतां, शान्त हवेंतून येणारे त्याच्या सारङ्गीचे भावमधुर सूर ऐकून काय वाटलें, हें या कवितेंत चित्रित केलें आहे.]

[ जाति–मनमोहन ]

मनमोहन वाजवुनी सारङ्गी काढी मञ्जुळ सूर ॥ध्रु०॥
विश्व निजलें, शान्त झालें
एक धरणी मात्र डोले
गम्भीरपणानें अन्धारांतुन छेडित जाई सूर
कम्प वाऱ्यांतून कानीं
तरल येती गोड गानीं
समरसती हृदयीं भाव, लागते गोड मना हुरहूर
नाचती हे वरति तारे
गात डुलती मन्द वारे
बघ तालावरती नाचूं लागे हृदय, वाहुनी पूर

अङ्गुलीची रागदारी
आंत उठते गुञ्जणारी
मग एकतान होऊन ऐकितें आंतुन कुणि आतूर
जीव डोले दिव्यतेनें
रोमरन्ध्रीं भरुनि गाणें
मन तन्मय होउनि मधुर माधुरी सेवित झालें चूर
रस, कला या एकवटुनी
बोलती कीं झङ्कृतींनीं
सौन्दर्य नाचतें थय्थय्, वाजति शब्दांचे नूपूर
काय कसलें गान गावें !
शान्त चित्तें व्याकुळावें !
तळमळुनी त्यांतच शोधित जावें वाटे पुढती दूर
म्हणुनि वरुनी येथ येसीं
सूर गन्धर्वींच घेसीं
शान्तवी लकेरी तप्त जिवा, तरि छेड छेड ते सूर
१२ जानेवारी १९२४ पुणें

## ४ कवितेचा जन्म

[ सुनीत ]

दृश्यें सुन्दर हीं अनन्त दिसतीं, वाटे धरूं कोणचीं
अन्तर्लोचन पाहती टकमका; व्यामोहते भावना
काही अस्फुट धावती द्रुतगती आकाशिच्या कल्पना
ये आंतून उचम्बळून, धरतां जातीं किती हातचीं !
काही रङ्ग सुरेख इन्द्रधनुचे वा पाचुची पालवी
सूर्याचे कर चण्ड वा शशिकला केव्हा सुधावर्षिणी
केव्हा कोमल भाव, नाजुक मनें प्रेमान्तराकर्षिणीं
केव्हा भेसुर रुद्रता, कुणि तरी ऐसें जिवा हालवी
गाई अस्फुट गीत मञ्जुळ कुणी तों आंत वीणेसवें,
कोणी कुन्चलिनें चितारित बसे रङ्गामधें अम्बर
फेसाळून खळाळ गर्जुनि हृदीं हेलावतो सागर
चित्तीं गोन्धळ होउनी क्षण मला ना हालवे, बोलवे !
देवी, एकवटून वृत्ति विरुनी लागे समाधी जरा
होतां वृष्टि सुधामयी तव, वदे सानन्द काही गिरा

९ जुलै १९२३ पुणें

## ५ सुनीत

[ सुनीत ]

जीवाची रमणीयता हरपली मुम्ताज जीवेश्वरी
  हेलावून शहाजहानहृदय व्याकूळ होई अति
सौन्दर्यप्रतिमा मनोहर तिची जी साठली अन्तरीं
  प्रेमें रत्नमणीहिऱ्यांत उभवी ती ताजरूपी स्मृति
हाले दिव्य कणाकणांतुन तिथे त्याची मनोभावना
  सौन्दर्यें दिसतीं सजून अजुनी मुम्ताजतेजापरी
नाना अस्फुट शिल्पकारमनिच्या सामावल्या कल्पना
  झाला ताजमहाल एकच जगीं; तो तोच त्याच्यापरी
होतें व्याकुळ चित्त आणि लहरी हेलावती अन्तरीं
  अन्तश्चक्षुस जेधवा नव जगीं सौन्दर्य किंवा दिसे
आम्ही होउन शिल्पकार अमुचे, ओतून कारागिरी
  शब्दीं ताज नवे नवे उठवितों– हे कल्पनांचे ठसे !
तूंतें 'ताज' म्हणून एक उपमा वाटे सुनीता, भली
  आहे सर्व जयांत, दिव्य परि ज्या कारागिरी लाभली

२३ मे १९२३ रहिमतपूर

ग्रंथ संग्रहालय
अं. क्रमांक नं. ३६८६
ता. ८-४-३०

## ६ स्थानभ्रष्ट फुलास

[ सुनीत ]

सन्ध्या ताम्बुस रङ्गली, विलसली शोभा वसन्तीं नवी
रानें मोहरलीं, विलासरमणी सृष्टी फुले मानवी
चैत्रींचा मधु गौरिवृन्द फिरतां शृङ्गारली वीथिका
चाले तों युवती पुढे सजुनिया कोणी मनोहारिका
बान्धा नीटस, उन्च; डौल तनुला किञ्चित्, कटी बारिक
ल्याली चन्द्रकळा, मधून पदरा ती सावरी अञ्जिरी
लेणीं रम्य गळ्यांतलीं चमकलीं त्याखालुनी साजिरीं
अम्बाड्यावर मोगरा सित खुले, कृष्णाम्बरीं तारक
टाकी पाउल ती झपाझप पुढे, मी चाललों मागुन
घाई–वायु, न वा कळे, परि पडे खाली तिचा मोगरा
लोभे अन्तर तोंच हात वळला–थाम्बे– निघेना मन !
झालों दूर झणीं, क्षणीं दचकुनी, निःश्वास टाकी जरा;
जातों डावलुनी फुला, रसिक मी घेऊं कसा ! वांकुनी–
स्पर्शाया धजतां, कुणी अडवितें आंतूनि बाहेरुनी

२३ ऑगस्ट १९२२ पुणें

## ७ सूरसङ्गिनी

[ कलावतीचें नितान्तमधुर शुद्ध रागदारीचें गाणें ऐकल्यावर— ]

[ जाति– अवनी ]

लावि जिवा वेड तुझी गोड गानबांसरी
सूरसङ्गिनी लकेर फेक पुन्हा हासरी ॥ ध्रु० ॥
तव गानीं तरलमधुर
मञ्जुळलें नीलाम्बर
सर्वांतुन एक लहर
येइ वेधणारी

वीणेची तरल झार
सारङ्गी मधुर फार
तींत मिळे हृदयतार
गोड रागदारी

स्पर्शुनि हलकेंच सूर
लहरींचें स्वप्न मधुर
जायांतें तरुन दूर
निर्मिसी विकारी

स्वरमय कीं हें विमान
सोडिसि, फेकून तान
जीव गात गात गान
मारितो भरारी

विश्वांतिल सुन्दरता
दावी स्वरसङ्गमता
रमवी हृदयङ्गमता
जीव मोहणारी

शान्तिपूर तव लहरी
भरती मम हृत्कुहरीं
स्वप्नसङ्गि दृक् तिमिरीं
होय पाहणारी

२१ जून १९२८ पुणें

## ८ खेळ

[ छन्द– उपचन्द्रकान्त ]

बघ चान्दोबा, आई !
माझ्या सङ्गतीं येई
बिम्ब आभाळीं हाले
माझ्या सङ्गतीं चाले

पहा डोङ्गर थोर
उठे बैसे समोर
आणि मीच धावतां
धावूं लागला अता

निळ्या खिडकींतून
चान्दणी ही वरून
हासतांना मजशीं
हासे बघून कशी !

झाडावर डहाळ्या
फुलें आणि या कळ्या
साऱ्या मशीं बोलती
माझ्यासङ्गें डोलती

किती ढग धावती
माझ्यासङ्गें पुढती
बघ मीहि थाम्बतां
तेही थाम्बती अता

सारे ऐकती माझें;
काय ऐकती तूझें ?
बघतेस का अशी ?
आई, बोल ना मशीं !

२ ऑगस्ट १९२८ पुणें

# ९ झोका

संग्रहांक नं. ३८०६
६-७-३०

[ लट्टूपटीचा संसार खेळून झाल्यावर, लहान मुली झोपाळ्यावर बसून, झोके घेत व गाणें गात माहेराचा प्रवास करतात. खऱ्या संसारांतहि असेंच असावेंसें वाटतें.]

[ छन्द– कोकिळा ]

झोका घेऊं या ग । झोका देऊं या
झोक्यासङ्गें माहेराला गात जाऊं या ॥ ध्रु ॥

सूर धरूनी वेगळा
गोड गाणें गाऊं गळां
गाण्यासवें आनन्दानें वर पोहूं या । झोका०

संसाराचा पुरे खेळ
आता करूं हातमेळ
आरामाया विमानांत चला बसूं या । झोका०

विसरूनी ताप सारा
जाऊं वरती भरारा
भराऱ्यांत सङ्गीताचें सूर भरूं या । झोका०

जाऊं नीट उन्चावर
सृष्टी पाहूं डोळाभर
सृष्टीसवें हसूं, खेळूं, बोलूं, नाचूं या । झोका०

येतां घर बाबा आई
भेटतील दादा ताई
प्रेमभरें एकरूप त्यांशीं होऊं या । झोका०

२० आक्टोबर १९२८ पुणें

## १० सप्तर्षि

[ सुनीत ]

शुक्राची नव हेमकान्ति खुलते अस्ताचलीं मोहक
विद्युद्दीप कितीतरी पटपटा हे लागती अम्बरीं
नाचे हें मृग मस्तकीं, यमपथीं शोभे अगस्ती, परी–
माझी दृष्टि तुझ्यावरीच, न कळे, कां लोभुनी थाम्बते !
जेव्हा तूं गगनांत हासत असा सायन्तनीं नाचसीं
मध्याह्नीस कधी प्रभातसमयीं ये पुञ्ज किंवा वरी
चक्राकार गति ध्रुवाभवतिची ऐशी तुझी पाहुनी
माझें चित्त रमे भुलून, हृदया मैत्री तुझी मोहवी !
मैत्री अन्तरिची अम्हांतिल, तुला न्याहाळितां कौतुकें
आम्ही आठ तुझ्यापरी म्हणुनिया, लागे तुळाया तुशीं
आम्ही आठ मिळून फेर धरतों ध्येयासभोती असे
ऐसें आन्तर हेतु, साम्य बघुनी, चित्तास आकर्षिती...
होवो साम्य खरें न वा; परि अम्हा तूझ्यापरी निश्चळ
विश्वीं जें ध्रुव तेंच लाभुन मिळो निष्कामतेचें बळ

९ एप्रिल १९२४ पुणें

अं. क्रमांक ३०५
ता. ८-४-३०

## ११ आत्मनिवेदन

[ सुनीत ]

तेव्हा क्षुब्ध दिशांमधून निघती निन्दापमानध्वनि
आलीं वावटळें कितीक, उठले सैतान खाया मला!
पोटाशीं निजबन्धुंना धरुनि मी चोहीकडे पाहुनी
गेलों गोन्धळुनी भयार्त हृदयीं अन्धार कोन्दाटला!
माझें साध्य, उद्या अनेकपरिच्या चित्तामधें थाम्बल्या
निःस्वार्थी बनलों; इथेच मनिच्या आशाहि मर्यादिल्या
प्रेमें आळविलें तुलाच हृदयीं, तूं मार्ग हा दाविला
गेलें दूर तमिस्र आणि पुढती मीं मार्ग चोखाळिला
माझें चित्त पुरें मुलांत रमलें; साध्यें मनीचीं जुनीं
चित्ताला दिसलीं इथेच; हृदया शान्ती मिळूं लागली
आलीं वावटळें पुन्हा; करकरा खाऊन दाढा कुणी
ओढी आंत मला, पुढे विचकुनी भेसूर दन्तावली!
मृत्यूचें विषही पिईन हरिखें मी सत्यसाध्यास्तव
त्याच्यावांचुन जीवनामृत नको, जेथे न शांती लव!

१२ मार्च १९२४, पुणें

## १२ नरकचतुर्दशी

[ सुनीत ]

आली शारद सुन्दरी सजुनिया; वाहून आलापिती–
  ओढे मन्जुळ गायनें खळखळा; हासे वनश्री मुदें
काढी शेतकरी खडा स्वर, पिकें वाऱ्यावरी डोलतीं
  आनन्दें जग डोलतें, नच कळे मन्दावतीं कां पदें !
पेठा पत्तनिं शोभिवन्त खुलती शृङ्गारलेल्या कुणी
  राङ्गोळी, बिजली, कुठे तसबिरा, कुण्ड्या, फुलें, तोरणें
कोठे गायन; धामधूम विलसे दीपावलीच्या सणीं
  रस्त्यांतून; सुखीं रमे जग, परी गे काय वाटे उणें !
स्वच्छन्दीं फुलपाखरें बिलगतीं हासून, येतां घरीं
  डोळे सूचक, मूक भाव वदतीं 'आली दिवाळी' असे
गालीं रङ्ग तरङ्गती, वच जणों ! दृश्यें किती हासरीं
  डोळ्याला गतवर्ष, हाय ! दिसतां, लागे जिवाला पिसें
गेले तात म्हणून आर्त नयनीं माझ्या जळें दाटलीं !
  आई अन्तरली म्हणून तव गे प्रेमासवें गोटलीं !

१९ आक्टोबर १९२२ पुणें

महाराष्ट्र-साहित्य-परिषद.
परीक्षा वर्ग, केंद्र ठाणें.
२०.

## १३ पितृस्मृति

[ सुनीत ]

आलों पुण्यपुरीहुनी बहुदिसां, गांवाकडे चाललों
  मार्गीं शान्त भयाणता पसरली, ये मस्तकीं चन्द्रमा
तारा अस्फुट हासल्या, विलसली कोजागरी पौर्णिमा
  गांवासन्निध, माळ, ओहळ किती ओलाण्डुनी, ठाकलों
बोले अस्थिर चित्त आंतुन, 'कुठे जाऊं ? कुणाच्या घरीं ?
  माझें कोण इथे अता ?' थडकल्या वेगांत लाटा अशा
'माझें कोण बरें ! उजाड ! विभवें तीं पावलीं दुर्दशा !'
  चित्रें बालपणांतलीं सरकलीं; भारावलों अन्तरीं !
वाडे उन्च विशाळ ! आप्तगण वा सारे सगेसोयरे
  होते दङ्ग सुखांत; हाय ! नव्हतें माझें कुणी त्यांतलें
भिन्ताडें पडकीं समोर दिसलीं ओसाड ! गेलों त्वरें
  सारें शून्य भुताटकीपरि गृहीं एकाच त्या भासलें !
दारीं धावुन कोण वत्सलपणें आता कडी काढिल !
  कोणाचे झरतील अश्रु ! कुठलें कौतूक नेत्रांतिल !

६ आक्टोबर १९२७ रहिमतपूर

## १४ पडलेल्या ताऱ्यास

[ नोव्हेम्बर महिन्यांत वरेच उल्कापात होतात. त्याच महिन्यांत घडलेल्या प्रियजनवियोगावरील ही विलापिका आहे. ]

[ वृत्त—स्रग्विणी ]

शून्य झालें मनीं ! शून्य झालें जनीं !
शून्यता वावरे तारकांच्यांतुनी !
दिव्य गङ्गा असे जाहली पाण्डुरा
अश्रु ढाळोनिया दीन झाली धरा

हें वियोगें तुझ्या शून्य हो अम्बर
अश्रुपातें मम श्रान्त हो अन्तर
हाय ! चेतोहरा तारका, तेथुनी
लोपलासीं असा कां उडी टाकुनी !

त्वद्वियोगानलीं अन्तरीं पोळुनी
शर्वरी पातली आसवें गाळुनी
दीन तारा उड्या खालती घालती
हाय ! ना एक, ना दोन, शोकें किती !

या दिशा येउनी, हुन्दके देउनी
अश्रु वा वर्षती सारख्या स्फुन्दुनी
स्वर्मणी लोपला पाहुनी वा कुणी
अप्सरा फेकिती त्यावरी पद्मिनी !

पुण्य आत्मा नभा लाभुनी लोपला
हा फुलांचा निधी कीं नभें फेकला
देव वा अन्त्य ही स्वर्गपुष्पावली
फेकिती कीं अहा, मूर्ति ही चालली !

हाय ! जीवा महाभाग हे तारका
कीं सरे आज पुण्यांश, उद्धारका
प्रेममार्गीं कुठे आत्मयज्ञार्थ वा
टाकिली त्वां उडी, स्वर्गिच्या राजिवा

स्वर्ल्लामा नभा हासवीलें जिथे
आज शून्यत्व कां ओतिलेसीं तिथे ?
बालकें हासुनी जीं नभःप्रांगणीं
रन्जलीं, गान्जलीं तींच तारागणीं

हाय ! निस्तेज ही तारका जाहली !
कीं वियोगें तुझ्या तत्प्रभा लोपली !
भोवताली तिच्या मैत्रिणी पातल्या
शोकवीची तिच्या अन्तरीं दाटल्या

कण्ठ ही दाटले ! शब्द ही लोपले !
लोचनीं आसवांचे झरे लोटले
खिन्न झाल्या दिशा ! फुन्दफुन्दोनि हा
न्हाणितो अश्रुनीं थण्ड वायू, पहा

प्रेम द्यावें जसें, प्रेम घ्यावें तसें
भावनेनें तया दुःख या होतसे
अन्तरींच्या कळा भावनेवांचुनी
कोण रे जाणतो अन्य मित्राहुनी !

एक झालीं मनें प्रेमभावें जिथे
भावना भावती अन्तरातें तिथे
शोककल्लोळ हा अम्बरीं दाटला
अश्रुचा पूर या अम्बरीं आटला !

स्वःसुमें वेचिलीं प्राणनाथासवें
तेथ कीं वेंचणें हाय, हीं आसवें !
जेथ मेघासवें चञ्चला नाचली
तेथ राहील का ती सखी एकली !

साभिमान ध्वजा रोविली वैभवें
का दरिद्री जिणें तेथलें मानवे ?
दुःखभावें सती याच, ती विव्हला
म्लान होई; तिला घोर हा लागला !

चन्द्र गेला असे दूर विश्वावरी
राज्य होतें तुझें तारका, तोंवरी
चन्द्र होतास तू तारकांच्यामधे
सोडिलें कां नभा आज, तेजोनिधे !

ये विरक्ती मनीं; दूर पुण्याश्रमीं
योग्य वाटे तुला राहणें नेहमीं,
सोडुनी अम्बरा गुप्त होसीं तरी
साङ्ग वाटे तुला काय तें अन्तरीं

खेळली शर्वरी सङ्गतीनें तव
लाजली, पाहुनी दिव्य तें वैभव
नाचली पाहतां तूज मन्दाकिनी
रञ्जवीती तुला अप्सरा गायनीं

कल्पवृक्षें दिला गन्ध दिव्यस्थलीं
सत्कवींनीं तुला गायनें गाइलीं
थोर हें वैभव स्वीय टाकूनिया
बैसलासीं कुठे जाउनी, राजया !

देवदैत्यांमधे युद्ध वा जुम्पलें
तेथ सेनापती तूजला नेमिलें
शूर तारागणा घेऊनी, मोहरा
कीं करायास, तू धावसीं सङ्गरां ?

कीं यतीनें कुणीं शापिलें स्वस्थलीं
यक्षिणींची तुला दृष्ट वा लागली
सृष्टिनें ओढिलें प्रेमभावें तुला
नातरी कासया पात हा जाहला !

प्रेमभावास वा वायुच्या मोहुनी
ठाव देशी हृदीं त्याचिया जाउनीं
पुण्य आत्म्याचिया सङ्गतीं अम्बरीं
राहण्यातें कुठे काय जाशी दुरी ?

भक्तिमार्गीं जिवा वेड जें लागलें
कीं ध्रुवानें तुला त्यांत बोलाविलें
जीव पावे तिथे एकता अन्तरीं
हाय ! गेलासि तूं साङ्ग कोठे तरी !

जीव हा भागला तूझिया चिन्तनीं
कण्ठही शोषला आज आक्रन्दनीं
देह गेला तरी वावरे भोवती
काय आत्मा तुझा आमुच्या सङ्गतीं ?

उच्च हातीं पद स्वीय आलें कसें ?
तेज कैसें तुला लाभलें सूर्यसें ?
ज्ञान माझ्या हृदीं देइ हें ओतुनीं
राजसा, एकदा दृश्य तूं होउनी

उन्नतीनें स्वयें होउनी पावन
धन्य होईन मी एकता पावुन
'शांति लाभो तुला' एक इच्छा भली
अर्पितों ही तरी अश्रुची अञ्जली !

२४ नोव्हेंम्बर १९१६

# १५ मैत्रीचें सिंहावलोकन

[ मैत्री जडल्यावर तींत प्रथम काव्यात्म गोडी, मग भाण्डणें हीं व्हायचींच व पुन्हा सलोखाहि व्हायचाच. अशाच एका मैत्रीचें यांत सिंहावलोकन केलें आहे. ]

[ सुनीत ]

तेव्हां रम्य उषा ! जरा उमलली कोठे जिवाची कळी
          होतीं स्वैर कुठे नभांत फिरुनी चण्डोल हीं मानसें
वारा गोड, सुरम्य रङ्ग नभिचे पाहूनि गालीं खळी
          बाल्याची हसरी पडे, मन जडे, सौख्यास सीमा नसे
मध्यान्हीं रवि तापला ! क्षणभरी दूरावलों आपण
          गोडी लोपुनि जाय, होरपळलों खातां लपेटा किती
लागे आंच जिवास, किल्मिष जळे चित्तांतलें मीपण
          देहीं दूर, परी मनें मिळतसूं येऊनि वाऱ्यागती
होती रात्र पुढे भयाण कळलें नाहीं जिवा, ही जरा
          आले मेघ गडाडुनी, कडकडे विद्युल्लता–वादळ
गेले तुम्बळ अम्बुधी खवळुनी, भङ्गोनि गेली धरा
          दो टोकांस परन्तु पाहत उभे होतों किती निश्चळ !
दुर्दैवी सरली निशा; विमलता पूर्णत्व दे प्रीतिला
          येई दिव्य उषा; उषामय पुढे रस्ता असे आपुला

५ आक्टोबर १९२२ पुणें

## १६ विसरलेला नमस्कार

[ सुनीत ]

जातांना चरणावरी शिर तुझ्या ठेवीन हें योजिलें
आली वेळ, वियोगदुःख मनिचें कण्ठामधे साठलें
अन्धारीं सरली समोरुन तुझी चारित्र्यचित्रावली
काही आणिक थोरवी मज तुझ्याठायीं दिसूं लागली
लोपोनी भगिनीपणा, जननिची आली तुला श्रेष्ठता
होतों तेथ उभे तसेच, गमलें तूं माय, मी बालक
आईचें कविगीत तोंच घुमलें कानीं मनःपोषक
वाढे थोरपणा तुझा, मज दिसे, झालीस तूं देवता
ये दिव्यत्व तुला; विराजुन शिरीं तीं स्वर्गिचीं वैभवें
दिक्काला तव दृष्टि व्यापुनि उरे; तेजें तुझीं फाकलीं
अश्रूंनीं भिजलीं जगें, नच मना व्याप्ती तुझी कल्पवे
झालों लीन, समाधि तोंच असल्या दृश्यामधे लागली
होतों सान परन्तु ये तुजमुळें किञ्चित् मला थोरवी
देवी, भक्त म्हणून बन्धु तुजला वन्दी अशा वैभवीं

१३ आक्टोबर १९२२ पुणें

## १७ ताईच

[ सुनीत ]

'ताई तू, तव बन्धु मीहि' अपुरें नातें गमे हें मना
'झालों बालक, माय तू हि' गमलें, तेंही पडेना पुरें
'देवी तू, तव भक्त मी' मन वदे; तों बोलली भावना
'गेलों दूर किती किती तरि पहा, हीं लाम्बलीं अन्तरें!'
वाटेना हळव्या जिवास बरवें घेतांच मोठेपणा
वाटे, तीं तुजला नकोत विभवें वा आसवांचे झरे
व्हावा निर्मल भाव मूक मनिचा, साधेपणा जीवना
साधे आपण; तीं कशास गरिबा गे मन्दिरें गोपुरें
व्हावी कृत्रिमता कशास ? दिधलें नातें प्रभूनें भलें
झालों आपण एकमेक अपुले सम्बोधुनी ही तसे
पावोनी सहवास, एकमनता भक्तींत जी लाभते
लाभो ती; परकेपणांत हृदय व्याकूळ गे होतसे
भक्तीला उपमा अनेकपरिच्या मी द्यावया योजितों;
जाती विस्मरुनी क्षणांत, सहजीं 'ताईच' सम्बोधितों.

२० डिसेम्बर १९२२ पुणें

## १८ मातृप्रेम

[ सुनीत ]

निःस्वार्थी तव पाहुनी रसिकता श्रीशारदामन्दिरीं
  काव्याची पिउनी सुधा, तुज मनोभावें कुणीं वानिलें
तूतें गौरविलें कुणीं सुवचनीं प्रेमार्त विद्वद्वरीं
  हातीं देउनि पुष्पगुच्छ, तुजला सानन्द सन्मानिलें
'पुष्पांचा तव गुच्छ नेउनि घरीं द्यावा मधूला' गमे
  हातांतून तुझ्या हळूच सहजीं मी घ्यावया लागलों
तूं गम्भीरपणें परंतु न दिला; मी थाम्बलों सम्भ्रमें
  स्वार्थी मी खिजलों मनांत; बघुनी वृत्ती तुझी कोपलों
केलें तूं सदनीं विषण्ण मधुला; सन्तापलों अन्तरीं
  जातांना वदलास कीं 'जननिच्या पायींच हा वाहणें!'
कीर्ती वाहुन वन्दणें तिज सख्या, जाऊन आधी घरीं
  गेला राग कसा कळे न मजला; ओथम्बलीं लोचनें
पुत्रप्रीतिमुळें मनांत जळलों स्वार्थांत मी लोभुनी
  मातृप्रेम तुझें उदात्त परि हें मी लाजलों पाहुनी!

६ सप्टेम्बर १९२३ पुणें

## १९ वनदेवीचें गाणें

[वनदेवी आपल्या सख्या फुलवेल, लतिका, निर्झरणी व उषा यांना निर्झरकृष्णाच्या भेटीस नेण्यासाठी पहाटेस हें गाणें म्हणत आहे.]

[जाति—बालानन्द]

चला चला ग पाण्याला गात गात मधु गाण्याला
जलकुम्भ करीं घेवोनी चला गडे झणि कुंजवनीं
प्रभात गोपींनो झाली अरुणाची लाली फुलली
विहङ्गरव नच हा झाला मुरलीचा मधु रव आला
वसन्त अपुला खेळगडी सृष्टीवर चित्रें काढी
फुलांमधें तो लपलेला करी सदा मोहनलीला
चहूकडे तो पसरि फुलें नाजुक पुष्पांचें जाळें
बैसुनिया वृक्षावरती मृदुल फुलें मारील किती
तेच फुलांचे मृदु बाण हरतिल हृदयाचें भान
करुनि तुम्हां वेडे वेडे हिसकाविल जलकुम्भ गडे
पाहुं नका इकडे तिकडे ना तरि, हृदया भूल पडे
हिरव्या गालीच्यावरुनीं निर्झरकुञ्जीं चला झणीं
नका भुलूं त्या लीलेला चला सयांनो, चला चला

फुलवेली, तूं हसत गडे		काय राहसीं उभी पुढे
पुष्पांचें पातळ नेस		लाग गडे चालायास
लतिके, बाई डोलुनिया		काय पाहसीं तरुवरि या
हिरवा शालू नेसूनी		कुम्भ फुलांचे घेऊनी
झाकुनिया पदराखाली		हळूच उतरुन ये खाली
कलिकांचे पैन्जण पायीं		घालुनिया चल गे बाई
कलिके, काय वदूं तुजसी		झोके आनन्दें घेसीं
मन्दानिलसङ्गें लीला		पुरे जहाली कीं न तुला
सोड तया ये ग खाली		सख्या उभ्या तव भवताली
दवबिन्दूंचा मणिहार		गळां घालुनी ये उतर
मुग्ध आपल्या मधु स्मितें		हसवि गडे तूं जगतातें
अर्थ तुझ्या मधु हसण्याचा		उकलिल कोणी प्रेमाचा
निर्झरिणी, अपुलीं गाणीं		प्रेमाची वनिं गावोनी
चाल गडे सखिच्या सङ्गें		रहस्य त्यामधलें साङ्गे
खळखळखळ खडकांमधुनी		गाणें गाउनिया रानीं
घेउनि बुद्‌बुद्‌कुम्भ करीं		गाण्याच्या ओतुनि लहरी
सर्व जगाचें मनोमन		एक करीं तू रिझवून
दिव्य प्रेमाचें रान		तुजपुढती आहे छान
प्रेमाचे घुटके जगता		पाजुनि जा जातां जातां
निर्झरास चल भेटाया		आनन्दानें जाऊं या
उषे, रक्त कां तू बाई		कुणा लाजशी इतुकी ही !
सविता येइल म्हणुनी कीं		प्रेमाची लाली इतकी
चन्द्रकोर ही मावळती		कळशी घेउनिया हातीं
उतरुनि ये भूवर खाली		प्रेमाची मिळणी झाली

जाऊं या निर्झरकुञ्जीं ऐकाया निर्झरगुञ्जीं
चला सयांनो, पाण्याला गात गात मधु गाण्याला

वळणें वळणें घेऊनी निर्झर खेळे रानिंवनीं
तरङ्ग लहरीवर फेस मोत्यांचे सारे घोस
त्या मोत्यांच्या करुं माला निर्झरकृष्णा अर्पु चला
मोतीं त्यांचीं घेउनि तीं तयास अर्पू निजहातीं
प्रेमध्वनि येई ऐका टिपरीचा चाले ठेका
रासक्रीडा प्रभातची चाले त्याची प्रेमाची
मञ्जुळ मुरलीचा नाद उठवी हृदयीं पडसाद
प्रेमाच्या एकत्वांत विलीन हृदयें मिळतात
मिळवूं या हृदयें अपुलीं जाउनिया एकामेळीं
प्रेमसख्यांनो, तरी चला भेटूं निर्झरकृष्णाला
चला सयांनो, पाण्याला गात गात मधु गाण्याला।

१९१४ पुणें

## २० शान्तिस्थान

[संसारतापानें तापलेल्याला विश्रान्तिस्थान हें पाहिजेच असतें. त्यांतल्या त्यांत निसर्गांचीं शान्त व सुन्दर एकान्तस्थळें मन लवकर निवावितात. माझ्या गांवच्या अशाच एका स्थलाला उद्देशून ही कविता लिहिलेली आहे.]

[ जाति – कोकिळा ]

एकच शान्तिस्थान मला तूं । एकच शान्तिस्थान
रानें भवताली हिरवळलीं
शेतें गन्धानें दरवळलीं
जळें ओहळांतुन खळखळलीं
विन्झणवारे वंशतरूंतुन गाती मञ्जुळ गान
खडक बाजुला विशाळ सुन्दर
खाली ओबडधोबड फत्तर
कपारींत हीं झुडपें वरवर
शुभ्र, लाल या तटीं कण्हेरी डुलती लववुनि मान

गवतुन गेल्या काळया डगरी
एक झोपडी ही उन्चावरि
पलीकडे त्या, माझी नगरी
फुले फुलोरा, मीच फुलारी हा माझा अभिमान

उत्तरेस डोङ्गर चन्द्रागिरि
समोर पूर्वेला अम्भेरी
दक्षिण बाजू विस्तृत भारी
पश्चिमझाडीमधून दिसती शुभ्र घुमट हे छान

पलीकडे, कृष्णा खोऱ्यांतुन
अजिङ्क्यताऱ्याच्या शेजारुन
मुरडत जाते, वळसा घेउन
अन्तर्लोचन इथून बघती प्रदेश पुढले सान

नील क्षितिजीं अन्धुक टोकें
किरणानें चमकतीं हीरकें
सह्याद्रीचीं म्हणतीं नाकें
मूर्तिमन्त मज इतिहासाचें दिसतें पुढती पान

उन्च जरन्डा वायव्येला
धर्माच्या फडकवी ध्वजेला
जवळुन खालुन रस्ता गेला
प्रियमित्राच्या गांवा वळणें घेउन रानोरान

दृष्टी सौन्दर्यानें भरतें
जीवनकलहाशा मग मरते
दिव्यांतुन अन्तर गिरगिरतें
एकान्तीं या जरा बैसतां नुरे जिवाचें भान

संसारांतिल भेसुर चिन्ता
जाळिति अन्तर जातां येतां
इथेच पावे मन तन्मयता
स्वर्ग आमुच्या तू नगरीचा, केवळ तू मत्प्राण
सन्मार्गानें कष्ट करूनी
भल्याबुऱ्यांचे शाप घेउनी
अल्पपणें भूमाता सेवुनि
एक दिनीं तरि जग विसरावें होउनिया रममाण
आजवरी जीं लिहिलीं गाणीं
यावें येथे तींच घेउनी
ओहळासवें सूर धरूनी
श्रोतागायक मीच होउनी एकच ध्यावें ध्यान
किंवा माझ्या प्रिय सुहृदाला
किंवा माझ्या प्रिय ताईला
किंवा माझ्या जीवसखीला
घेउनि गोष्टी इथे कराव्या, करुनि सुखामृतपान

२५ आक्टोबर १९२३ रहिमतपूर

# २१ समर्थांचें चाफळ

[वृत्त – पृथ्वी]

सुरम्य भगवी ध्वजा बघुनि ही तुझी लाम्बुनी
उचम्बळुनि अन्तरीं तुजसि वन्दितों थाम्बुनी
कितीक दिस आतुरे मन बघावयातें तुला
पुनीत तरि येउनी खचित जाहलों आजला
प्रसन्न रमणीयता विलसते तुझ्याभोवती
फुलोनि हृदयीं, हसे मधुर सृष्टि लीलावती
नव्या हिरवळी, नवे तरु, नव्या लता शोभती
फुलें नवनवीं, नव्या तुजसि मञ्जरी लाभती
सुरम्य हिरवेंनिळें भवति डोङ्गराचें कडें
बघून मन वेधतें तव विलोल शोभेकडे
कुणीं तट विशाळ हे तुजसि पाचुचे बान्धिले,
निळे बसवुनी खडे मधुनि, हे कुणीं सान्धिले ?
कुणीं स्फटिकशुभ्र ही तुज दिली नदी माण्डवी
तियेंत नव मौक्तिकें कवण फेकुनी साण्डवी;
कुठून कुरणें तुला उतरणीवरी लाभलीं;
कुणीं तुज मऊ मऊ हरितवर्ण शेतें दिलीं ?
बलिष्ठ तुज व्हावया कुणि दिलीं गुरेंवासरें
तुझे झुळझुळोनिया कथिति काय ओढे बरें ?
सतेज तुज बुद्धिमान् सुजन लाभले भाविक
मिळे अतुल मोहरा तुज भवाब्धिचा नाविक
स्वरूप तुजला दिलें मन रमेल ऐसें खरें
जिवन्तपण द्यावया मधुर साठविले झरे

स्वचित्त रमवावया प्रभुपदीं, दऱ्या निर्जन
मिळे तुजसि जागृतीस्तवाचि दासबोधी मन
इथोनि सुटले निदेश, जन शासिले येथुनि
दुही मिळविली धुळीस जन आपुले बोधुनी
स्वराष्ट्र, निजधर्म गर्जुनि उठे तुझ्या स्फूर्तिनें
सुखांत, तव गाइलीं मग जनीं यशोगायनें
सह्यावरिल वायुनें गुणगुणून तेच स्वर
दिले इतर बान्धवा, तरि खळाळती निर्झर
दऱ्या दुमवुनीच ते स्वर अजून कीं बोलती !
तरीच तरु ऐकुनी विभवगान, कीं डोलती !
श्रवून तव बोल हे, मम सखा तुझा शाहिर
जिवन्त वचनें तुझीं मधुर पोचवी बाहिर
ममत्व जडलें तुझ्यावर, दुणावलें आज तें
'सखाच मम तू' तुला मधुर कल्पना साजते
अखण्ड तव चालली अशि परम्परा मागली
तरीच जनदृष्टि ही तुजवरी अता लागली
पुन्हा विभव तें तुझें, स्वजनसौख्य पाहावया
तुझ्यावरिच लावुनी नजर बैसतों, राजया !

१ जून १९२५ चाफळ

## २२ पुण्यपुरीस

[ सुनीत ]

विद्यार्थी असतां करीं तव दिलें प्रेमें पित्यानें मला
माझें गांवच एक सृष्टि अवघी वाटे मला तोंवर
कीर्ती ऐकुनि, वाचुनी तव, मनीं आनन्द गे जाहला
येतां, प्रेमळ माय घेसि मज तू बालास माण्डीवर
होती पांखर पूर्ण; तू हळुहळू ज्ञानामृतें पाजिलीं
गेली झापड, दृष्टिचें क्षितिजही आलोकनीं फाकलें
तूझें शौर्य, बलौज, थोरपण हीं रक्तामधें बाणलीं
आशेनें चढलों गिरी वरिवरी, मच्चित्त धीरावलें
चित्ता चेतवितीं उदास तव हीं पूर्वस्मृतींचीं स्थळें
होत्या थोर विभूति येथ; मतिला त्यांनीं दिली चालना
भाषाप्रेम मनामधें उपजलें त्वद्ग्रन्थकारांमुळें
स्फूर्तीचा लव होय उद्भव मनीं, दाटुनीया भावना
उत्सङ्गीं तव वाढलों; मजवरी झालें तुझें गे ऋण
त्वन्नामार्थ तरी करीं विखरितों हे अल्प तेजःकण

१ जुलै १९२३ पुणें

## २३ विश्रामबागेजवळ

[ न्यायमन्दिरासाठी उपयोगिलेला पुण्यांतील विश्रामबागवाडा एकीकडे व सेवासदन ही स्त्रीशिक्षणसंस्था एकीकडे पाहणाऱ्या मध्यस्थास पुढील चित्र केव्हाहि दिसलें असतें. ]

[ जाति–दिंडी ]

कुठे आम्ही चाललों ? वरी–खाली ?
काय अमुची जाणीव अम्हां झाली ?
उन्च बाजूला न्यायमंन्दिरें हीं
कळस सोन्याचे; आंत काय होई !
बन्धु बन्धूचें रुधिर चाटिताहे
किती दीनांचा अश्रुपूर वाहे

अम्ही अन्याला घेउनी घरांत
एक पैशास्तव भाण्डतों मजेंत !
इथे शब्दाला मोल कोण आलें
इथे जीवा पारखे जीव झाले
गळा दाबुनि मारितों अनाथाला
बुद्धिसामर्थ्यें सत्य लपविण्याला
आणि इकडे या बाजुच्या घरांत
स्वार्थ होमुनि कुणि धीर वन्धु शान्त
दीन भगिनींना घेउनी सभोंतीं
सुधा ज्ञानाची गरीबींत देती
रुधिर वाहे बाजूस या भयाण
आणि इकडे हें अश्रूचेंच रान !
इथे गर्दी, खळ्खळे द्रव्य सारें
आणि यांना अश्रूच मात्र खारे
इथें सोन्याचा धूर निघत आहे
आणि यांना ढुङ्कून कुणि न पाहे
हाय ! कळवळतें हृदय किती आंत
'कुठें जातों ?' मग पुसे मी मनांत !

१८ जानेवारी १९२४ पुणें

## २४ कविकातळ

[पुण्यांतील फर्गसन कॉलेज टेकडीवरील ही एक विश्रान्तीची जागा आहे. तिला प्रस्तुत नांव केवळ विनोदानें देण्यांत आलें आहे. पण विद्यार्थिदशेपासून इष्टमित्र व गुरु यांच्या सहवासांत तिथे वेळोवेळीं जो काळ गेला, त्याची गम्भीर स्मृति पुढील कवितेंत साठविलेली आहे.]

[ गज्जल : वृत्त–माधव ]

वाटे मनांत सन्निध यावें तुझ्या जरी
कां दाटते अकारण हुर्हूर अन्तरीं
येऊन बैसतां मन व्याकूळ जाहलें
दृश्यें कितीक मागिल येतीं पुढे परी
विद्यालयीन यौवनकालांत येउनी
मी ध्येयमाधुरी इथ सेवी निजान्तरीं
भावी नव्या मनोरम सत्कल्पनेसवें
काव्यात्म बैसलों कधि गुङ्गून अम्बरीं
केव्हां उदासुनी मन, अन्धार दाटला
पोटीं प्रसन्नता परि तू घातली खरी
दृश्यस्वरूप उज्वल ध्येयें सभोवती
पाहून धीर मानस माझें पुन्हा धरी
संसारगीत गुम्फित केव्हां सखीसवें
मी थाम्बलों उषा नव पाहात लाजरी
आलों जमून वाङ्मयबन्धुस्वसा कधीं
केले विहार, वा दिन वेचून शर्वरी

आलापुनी कधी मधु सङ्गीत काव्य वा
वाऱ्यावरी तरङ्गविली गीतबांसरी
साधावयास उन्नति, गप्पा, विनोद वा
गूजें गभीर सौख्यद केलीं परोपरी
शोभा सुरम्य आरुण सौन्दर्य डोङ्गरी
भोतालिचें करीं मन वेड्यापिशापरी
केव्हां झुळूक शीतळ सेवूनि माधवी
सन्ध्या सतेज सुन्दर मी पाहि हासरी
केव्हां भिजून, हिर्वळ ऱ्याहाळिलीं नवी
सोडून कल्पना नव मी कल्पनेवरी
केव्हा धुक्यांत बैसुन वा चान्दण्यामधें
घालों मनांत, शारद सेवूनि माधुरी
काव्यात्मता खरोखर लाभे तुझ्यामुळें
स्फूर्तीस गावया, तव सौन्दर्य हो झरी
चित्त स्थिरावुनी मग मी गूढ चिन्तनीं
गेलों गढून लोचन लावूनिया वरी
शान्ती कितीकदा मज तेव्हां तुवां दिली
आताच दाटती मग का अश्रुच्या सरी !
जीवा गतस्मृतीमधि माधुर्य वाटतें
येतों म्हणून सन्निध तूझ्या खरोखरी !

६ ऑगस्ट १९२७ पुणें

## २५ अनाथ बालिकाश्रमांतील आरम्भीची खोली

[ जाति—प्रणयप्रभा ]

मन किती बघुनि तुज कौतुकतें
अभिमानें हृदया ये भरतें ॥ध्रु०॥

तरङ्गिणीची बघुनि भव्यता
जळविस्तारीं मधुर दिव्यता,
अवलोकाया उगमरम्यता
दृष्टि झणी मागे फिरते
किती पसरलीं किरणें शीतळ
वृक्षलतांना करुनी निर्मळ
जींतुन परि तीं आलीं कोमळ
तीस पहाया मन वळतें
भक्तिरसाची जणु अधिराणी
दूर पसरली अभङ्गवाणी
जींतुन, वीणा ती निजनयनीं
पहावया मन उत्सुकतें
कार्यभव्यता तुजभवतींची
पाहुन उठती हृदयीं वीची
सहानुभूती सादर मनिची
पहावया तुज आतुरते

१७ एप्रिल १९२८ पुणें

## २६ शनवार वाडा

[ गज्जल : वृत्त — वसन्त ]

तुझ्या विच्छिन्न रूपाला बघूनी फाटतो ऊर
हळाळे जीव; अश्रूंचा स्मृतींनीं दाटतो पूर
तटांच्या भङ्गल्या भिन्ती फुटोनि चौथरा गेला
जळालीं वैभवें सारीं; निमाले छातिचे शूर
इथे तल्वार बाजीची विराजे, मस्त रङ्गेल
इथे झेण्डा मराठ्यांचा उडे वाऱ्यावरी स्वैर
हिरीरी वीर भाऊची, मनीचा त्वेष चेतून
हटानें नाचवी घोडे कुरुक्षेत्रांत चौखूर
अरीला कापवी भीती; इथूनी माधवी नीति
पुकारी पेशवाईचा दरारा भारतीं दूर
विखारी गारदी घाला निखारे मत्सराग्नीचे
विचारी युक्तिनीं सारें जहालें शान्त काहूर
मराठेशाहिच्या मागे जरा होती तुझी आस
निमाली शाहसूनूचीं परी ध्येयें महामूर

समोती फुर्फुरे घोडा, झुलावा हत्ति दारांत
तिथे का रान माजावें! कुठे तो वैभवी नूर!
फवारोनी जिथे धारा रुपेरी साण्डले बिन्दू
तिथे ह्या पद्मकारञ्जीं विटांचा कोरडा चूर !
मराठी शूर मर्दांचे पवाडे गायिली वाणी
घुकारावें दिवाभीतें तिथें का काढुनी सूर !
खरावें काय जोत्यांनीं फुटूनी काळवण्डूनी
कड्यांनीं हाय, गन्जावें; दिसावें रूप भेसूर !
तृणांची लाट ही हाले; कुणाचे शूर रोमाञ्च ?
रणींच्या त्याच मर्दांची असे वा काय हुर्हूर ?
स्मृतीनें पाहणें आता मराठी तेज वा वाणी
नको गे कल्पने धावूं; बरें होणें मनीं चूर
कुणाला नांव ठेवावें! नशीबा लावणें हात !
कुठे कोणाकडे पाहूं, निराशे जीव आतूर !

२९ आगस्ट १९२३ पुणें

## २७ गोपाळ कृष्ण गोखले

[ सुनीत ]

धीरोदात्त तुझी अजून हसरी मूर्ती पुढे खेळते
तें बुद्धिप्रभ लोचनांतिल दिसे औदार्य आकर्षक
ती गम्भीर सहिष्णुता, वदनिंची शान्ती मनोदर्शक
तो मञ्जुध्वनि वाक्प्रवाह, पुढती सारें उभें राहतें !
त्वन्मानव्य अगाध ! नित्य रमलें देशैकभावें मन
राष्ट्रांच्या प्रगतींत पाउल पुढे केव्हा पडे हिन्दवी
या चिन्तेंत जळून, दूर करण्या दुःखें तशी यादवी
सोशी घाव अघोर ऐरणिवरी, द्यायास तेजःकण
होतें व्याकुळ चित्त ! बान्धव तुझ्या दारीं तदा पातले
अश्रूनीं हसरें कलेवर तुझें ते न्हाणुनीं वन्दिती
कार्यीमाजिं तुझ्या अलौकिक असें देवत्व ते पाहती
तें हृमन्दिरिं साठवून, सुमनीं त्यांनीं तुला पूजिलें
दृश्यादृश्यकणांत हें प्रगतिचें चैतन्य आलोकितों
अन् मी भारतसेवका, तुज मनोभावें नमस्कारितों

१० फेब्रुवारी १९२४ पुणें

## २८ निजलेल्या वसन्तास

[ वृत्त—पृथ्वी ]

गळ्यांत कर टाकुनी चिमुकला, मला बान्धुनी,
मुखास मुख लावुनी बिलगलास, विश्वासुनी
हळूच मग बोलसीं अडखळून 'नानें म्हना'
सुरावर सजे हि मी रिझविण्यास तूझ्या मना
सुरेल रव ऐकतां चलन सर्वही थाम्बलें
तुझे चमकदार लोचन वरी बघूं लागले
क्षणांत लय लागला, कमलनेत्र भारावले
अपाप मिटलीं दळें, भ्रमर झाकले आंतले
अशा मधुर मी सुखी तुजसि पोटिशीं घेउनी
सुखांत पहुडे तुझें मुख पुनःपुन्हा चुम्बुनी
हळूच मग सोडवी कर; जरा बसूनी दुरी
करांत कर घेउनी, नजर लावि तूझ्यावरी
मुखावर तुझ्या अशी अचळ दृष्टि मी लावुनी
मनांत रमतों सख्या, हृदय जातसे लोभुनी
तरङ्ग उठती किती वदनचन्द्र हा पाहुनी
असेल सुख कोणतें अतुल राजसा, याहुनी !
विशाळ तव भाळ हें, रुळति त्यावरी कुन्तळ
मनोहर किती तयामधुन शोभतें काजळ
कमान भुवया तुझ्या गरुडपङ्ख कीं दाविती
गुलाबकळिका टपोर तव लोचनें भासतीं
तुझी सरळ नासिका मदनबाण पुष्पापरी
उषा मधुर बिम्बली जणुं तवाधरीं लाजरी

तियेंत लपल्या जणों धवल तारकांच्या कळ्या
मधेच हसतां किती खुलति गोड गालीं खळ्या
लहान जिवणी तुझी, हनुवटी तियेखालती
सुरम्य मधली वळी खुलविते मुखाला किती
सतेज सुषमा मुखावर तुझ्या किती शोभते
प्रसन्न मुखशान्ति ही मजसि भारुनी टाकिते
निरभ्र तव भाळ मी बघुनि रङ्गतों चिन्तनीं
विलोल वदनाम्बुजीं नयन बैसती गुन्तुनी
क्षणांत ढग साठुनी तरळती मनोभ्यन्तरीं
कितीक मग अश्रुच्या कढुन, वाहताती सरी !
'विकासुन मनोज्ञ हें कमल, गन्ध जावो दुरी !
अमङ्गल तुला शिवो नच ! मिळो जगा माधुरी !'
मनांत अशिं बोलतों मग कितीक आशीर्वचें
हळूच कुरवाळुनी, सुमन चुम्बितों गालिचें !

२९ मार्च १९२४ पुणें

# २९ बालगन्धर्व

[ गज्जलः वृत्त–पाण्डव ]

गोड गानीं मोहनीनें भारिसीं तू गायका
गोड जादू लोचनींची शान्तवी नटनायका
निर्झरांची रागदारी साठली कण्ठीं तुझ्या
कोयळांची मञ्जु गाई काय वा आलापिका ?
भृङ्ग वा गुञ्जारवांनीं गुञ्जती कुञ्जांतले
गोड गन्धर्वी लकेऱ्या वाहती आंतून का !
शारदेची मञ्जु वीणा वाजते झङ्कारुनी
माधुरी वा तानसेना, मूर्त गाई गीतिका ?
सामगानीं वेद रङ्गे भावगीतें गाउनी
बांसरी बन्सीधराचीं आळवी शान्तीस का ?
पुष्पहासा, कीं फुलांचें हासणें हें लोचनीं
शान्त पाण्याचीं स्मितें हीं नाचतीं ओठांत का ?
अन्तरीच्या भावनेच्या दाटल्या किंवा सरी
इन्द्रचापाची खुले ही माधुरी त्यांतील का ?
कीं हसावें चान्दण्यांनीं येउनी डोळ्यांमधे
चन्द्रिकेनें वा फुलावें, दिव्यतेजोहीरका ?
कीं कला ये मूर्त खाली त्वन्मिषानें, राजसा
शान्तिदेवीची प्रभा ही मोहरे आंतून का ?
राजहंसा, मानसीं जों आपुल्याशीं रङ्गसीं
तप्त जीवा लाभते तों दिव्यतेची चन्द्रिका

२५ नोव्हेम्बर १९२५ पुणें

# ३० निशाणरोवणी

[ जाति – शशिकला ]

चल, निशाण धर हें करीं
पुढे चल नेटानें वरि, वरी ॥ध्रु०॥
युद्ध माजलें चहुबाजूंला
वीराला प्रतिवीरहि भिडला
उठली दङ्गल खरी । पुढे चल०
समशेरींची खण्खण चाले
तुटती भाल्यावरती भाले
चमकुनी बिजलीपरी । पुढे चल०
चढण कड्याची पुढली अवघड
परि जे चढले घ्यायातें गड
स्मरुनि तया अन्तरीं । पुढे चल०
करितिल खालुन दुर्दम मारा
भिडतिल पाठिस बाण भरारा
कच खाइं न रतिभरी । पुढे चल०
जीवित केवळ धूमधडाडी
जय त्याला, जो उत्पथ काढी,
निशाण परि सावरी । पुढे चल०

४ ऑगस्ट १९२९ पुणें

## २१ मावळ्यांचें गाणें

[छत्रपती श्रीशिवाजीमहाराजांच्या समाधीचें दर्शन घेण्यासाठी काही मावळे रायगडास जात आहेत व तोण्डानें हें गाणें म्हणत आहेत, अशी या कवितेची भूमिका आहे.]

[जाति – श्रीरङ्ग]

चला रायगडा शिवरायाचं दर्सन घेवूं ॥ध्रु०॥

ठेवुन् म्होरलं धोरन
ज्येनं बान्दलं तोरन
सङ्गं घेवून मावळ भावू
घेवुन् गडी दमूदार
केलं दुस्मन ठार
त्येची युगत शिकाया जावूं
बारामावळ रान
धरमाचं निशान
ज्येनं रोवल घेवून ठावू
बान्दुन्‌श्येनी आर्‌मार
घेर्‌ला समिन्दर्‌ पार
त्येच्या नौकची किरत गावूं
आईभैनीसमान
परनारीस मान
ज्येनं देवून मिळवलं नावू

मायबोलीचा जोर
करि दरारा थोर
        त्येचा पवाडा ऐकत ऱ्हावूं
भग्‌वा झेण्डा फिर्‌वून
जरिपट्‌का मिर्‌वून
        झाला समूशेरीवर जो रावू
म्हराट्यांचा बाणा
गेला गाजवून राणा
        त्येच्या समाधीवर फुलं वाहूं

१ आक्टोबर २९ पुणें.

# ३२ भलॅरी

['भलॅरी घालणें' म्हणजे पीक काढणें व तें काढतांना तोण्डानें उत्साह दायक गाणें म्हणणें. चान्दण्यारात्रीं पीक काढणें, जोन्धळा हा सर्व पिकांचा राजा मानणें किंवा भलॅरी घालून झाल्यावर इर्जिक - श्रमभोजन - करणें हे शेतकरीसाम्प्रदाय आहेत. या गाण्यांत, शेतकरी पुढील गाणें म्हणत एकमेकांस उत्साह देत, पिकाची काढणी करीत आहेत असें कल्पिलें आहे.]

[ जाति-कोकिळा ]

भलॅरि घाला चला गड्यांनो भलॅरिचं गा गीत
गड्यांनो भलॅरीचं गा गीत ॥ ध्रु० ॥
पाझरला रस ह्यो चन्देरी
डोङ्गर झाले समूद रुपेरी
घुमूं लागलं आनन्दाचं शेतांतुन सङ्गीत
गड्यांनो, शेतांतुन सङ्गीत । भलॅरि०
पाचोळ्यांतुन सळसळणारा
झुळझुळुनी ह्यो शीतळ वारा
सच्छन्दानं गात चालला आपुल्याच लहिरींत । भलॅरि०

सूर लावुनी येड्यावाणी
वोढा गाई अपुलीं गाणीं
सजण लागला जणू लावणी गाया खडकाळींत
गड्यांनो, गाया खडकाळींत। भलरि०
लवुन जुन्दळा देई डोल
राजा अपुला ह्यो बिनमोल
गाउन् त्येला, घाम जरासा गाळूं या मातींत
गड्यांनो, गाळूं या मातींत। भलरि०
कणखर दावुन म्हराटबाणा
गोळा करुं या मोतीदाणा
इर्जिक खावूं आनन्दानं, बसून मङ्ग्‌ काळींत
गड्यांनो, बसून मङ्ग्‌ काळींत। भलरि०

९ जुलै १९२३ पुणें

## ३३ वारेपाऊस

[ वादळांतून जो पाऊस निर्माण होतो तोच वारेपाऊस. तिसरे प्रहरीं बादळ झालें, पाऊस पडून गेला व ऊन पडलें म्हणजे सृष्टी कशी दिसते व असल्या वळवांनीं शेतकऱ्यांना किती आनन्द होतो, हें या कवितेंत रेखाटलें आहे. ]

[ जाति – कोकिळा ]

वारेपाउसगान गाउं या । वारेपाउसगान
गड्यांनो, वारेपाउसगान ॥ध्रु०॥
सूर्य उतरला मावळतीला
सन्ध्यावदनीं रङ्ग वहरला
राईवरतीं हीं पूर्वेला
किरणें हसरीं गोड नाचुनी, झुळझुळ डोले रान
गड्यांनो, झुळझुळ डोले रान
सोसाट्यानें तोंच भरारा
पूर्वेकडला वाहुन वारा
पर्जन्याचा पिटवि नगारा
वारेवादळ सभोवताली घाली मग थैमान
गड्यांनो, घाली मग थैमान
सळसळ पानें गोळा झालीं
पाचोळ्यांचीं हीं वेटाळीं
गिरकी घेतीं वरती खालीं
फिरकत येई धूळ पुढे ही, गिरगिरुनी बेभान
गड्यांनो, गिरगिरुनी बेभान

सर सर सर तों काळे धूसर
पूर्वेला ढग आकाशावर
चढूं लागले व्यापुन डोङ्गर
कीं देवांचीं वरून सुटलीं दिव्य विमानें छान
गड्यांनो, दिव्य विमानें छान

मागे उतरे पाऊसफळी
दों बाजूंला या वावटळी
मधेच खुलती अम्बेओळी
सोनेरी चान्दणें तयांवर हसतें पानोपान
गड्यांनो, हसतें पानोपान

क्षणांत झालें सर्वच धूसर
काळवण्डलें वरलें अम्बर
दूर साण्डले धारांचे सर
गार हवेंतुन ये मातीचा सुगन्ध, भिजतां रान
गड्यांनो, सुगन्ध भिजतां रान

खाली हर्षें मोर नाचती
ढवळे बगळे हवेंत फिरती
पाऊसकिडे वर भिरभिरती
किंवा फिरतीं नवीं भविष्यें गरिबांचीं बलवान
गड्यांनो, गरिबांचीं बलवान

गडगडाट तों झाला गगनीं
तडिल्लतेची रेघा चमकुनि
नर्तन करिते मधुनी मधुनी
इन्द्रधनूची सुन्दर विलसे धारेवरति कमान
गड्यांनो, धारेवरति कमान

थेम्ब टपोरे तों टपटपले
धारासारीं मेघ ओतले
वाऱ्यानें बेफ़ाम जाहले
दङ्गल उठली, ओढे गाती खळखळुनी रणगान
गड्यांनो, खळखळुनी रणगान
डिखळें जागोजागीं विरुनी
पाणी वाहे शेतांमधुनी
पाहुनि वैभव हें, कोपींतुनि
घुमवूं गाणें आनन्दानें निवतां पञ्चप्राण
गड्यांनो, निवतां पञ्चप्राण
अन्धारुन जग आलें भवती
गडी सान्जचे घरास निघती
खड्या सुरानें कुणि आलापिति
त्या गाण्यावर गुञ्जत जाऊं आपण मारुन तान
गड्यांनो, आपण मारुन तान !

२३ मे १९२६ रहिमतपूर

## ३४ परित्यक्ता

[ दुर्वर्तनी नवऱ्यानें टाकल्यावर, प्रेमळ, कर्तव्यनिष्ठ पण जुन्या संस्कृतींत वाढलेल्या अबलेची झालेली असहायस्थिति, ही या कवितेची भूमिका आहे.]

[ जाति–प्रणयप्रभा ]

किति करूं विनवणी तुज आता
कां कणव न ये अजुनी नाथा ॥ध्रु०॥

वेडी होऊन येतां दारीं
घेतलेंस तू प्रेमें पदरीं
गृहसुख देउनि, कां कान्तारीं
त्यजिसिं असा करुणावन्ता ?

घेउनि दोन्हीं चिमणी बाळें
जाउं कुठे मी हीं लडिवाळें
लहर तुझी फिरतां का झालें
अपराधी मी प्रिय कान्ता ?

कोण चञ्चला मानस भुलवी
वरकरणी मायेनें झुलवी
संसारीं मम वीष कालवी
तुजविण कोण मला त्राता

रहा सुखानें तू तिजसङ्गें
राहिन मी, मत्प्रीति न भङ्गे
सेविन पाय खपूनी अङ्गें
देई परि मज सन्निधता
नातरि राहूं दे शेजारीं
झाडिन अङ्गण प्रहरीं चारीं
सेवा करुनी राहिन दारीं
गाईन तव पूर्विल गाथा
रोज सकाळीं होइल दर्शन
मावेल सख्या पोटीं हर्ष न
करी एवढें अमृतवर्षण
बाळगळ्यांच्या तुज शपथा !

३१ आक्टोबर १९२७ अक्कलकोट

# ३५ टाकलेली

[दुर्वर्तनी नवऱ्यानें टाकल्यावर, प्रेमळ कर्तव्यनिष्ठ पण नव्या संस्कृतींत वाढलेल्या अबलेची झालेली असहायस्थिति, ही या कवितेची भूमिका आहे.]

[ गज्जलः वृत्त-राणी ]

माफी मजला करा दयाळा। तोडूं मज द्या विवाहमाळा ॥ध्रु०॥

साहे छळ फार आजवेरी
सोसे न अता अनीतिचाळा
होती तव अन्तरांत गङ्गा
आटे परि आज तो जिव्हाळा
पेटे मम बाग ! का म्हणूं मी
दैवांतच यापुढे उन्हाळा
किंवा शमवावया कहाली
नेत्रीं मम नित्य पावसाळा
कीं हा प्रणयद्रुमास माझ्या
येई वठवावया हिंवाळा
गेला मम ताज ढासळूनी
आता सुख कोठलें कपाळा
प्रीती वितरून सर्व आता
जोपासिन आपुल्याच बाळा
अन् मी भगिनीहितार्थ आयू
वेचूनच शान्तवीन जाळा
सौख्यांत असा तुम्ही कुठेही
जातें हृदिं, दाबुनी उमाळा !

१ नोव्हेम्बर १९२७ अक्कलकोट

## ३६ भावाचे अश्रु

[ सुनीत ]

दुर्दैवी भगिनी समोर निजली खाली बिछान्यावरी
तोही वाचित 'आत्मवृत्त' बसला मेजापुढे, रङ्गुनी
काही वाचुनि भाग तों खवळला, मुद्रा दिसे कावरी
झाला तो विमना, समाधि सगळी गेली झणी भङ्गुनी
काळोखी रजनी भयाण भवती बाहेर कोन्दाटली
तेवे दीप समोर, तेज पडलें त्याचें जरा पुस्तकीं
होती दुःखित आननीं भगिनिच्या त्याचीच तेजावली
आता तो द्रवला मनीं, उसळलें काही जरी मस्तकीं !
दृष्टी लागुनिया मुखावर, तिचें चारित्र्य आलें मनीं
'काळानें करणी अघोर करुनी, आम्हां असें ठेविलें !
माझ्यावाचुन हाय–कोण हिजला ! ताई किती ही गुणी !'
चुम्बाया तिजला, असें वदुनिया तों ओठ सर्सावले
होतें पाप न; साश्रु वाकुनि परी चित्तास तो आवरी;
बिन्दू दोन कढून मात्र गळले तीच्या कपोलावरी !

२२ जुलै १९२५ पुणें

# ३७ पाय घसरला तर

[ स्त्रीजातीसम्बन्धीं आदर व अनुकम्पा असणें हें थोर मानवतेचें लक्षण आहे. ज्या समाजांत हे गुण नसतात तो दुर्दैवी, इतकेंच नव्हे तर ज्या समाजांत स्त्रियांच्या बाबतींत अनेक अन्याय बेपर्वाईनें केले जातात तो नैतिकदृष्ट्या अधःपतितच. या तत्त्वावर या कवितेची उभारणी केली आहे. संवादस्थळ महाबळेश्वर येथील 'हत्तींचें गण्डस्थळ' ऊर्फ 'लॉड्विक् पॉइन्ट्' हें आहे. त्याच्या निमुळत्या पण भूशिराप्रमाणें प्रतापगड किल्ल्याच्या रोखानें पुढें घुसलेल्या टोकाकडे, एका अवघड व अरुन्द वाटेंतून भाऊ व त्याची विधवा बहीण ताई हीं जात आहेत. दोन्ही बाजूंला भयङ्कर खोल दऱ्या असल्यामुळें भाऊनें ताईला जपून येण्यासम्बन्धीं जी सूचना दिली, तीच या संवादास कारण झाली.]

[ जाति–नृपममता ]

भाऊः—

ये हळू जपूनच ताई
काळाची बघ ही खाई । बाजुला
हा सोसाट्याचा वारा
विक्राळ भयङ्कर सारा । हा कडा
ही सुळक्यावरची वाट
छे ! फिरती डोळे धीट । बघुनिहि
सावरून—नीट ये वरून—अशी धरधरून
बघुं नको खालीं । घसरला पाय तर, खोली । ही किती !
ये इथे बसूं टोकाशीं
या शेवटल्या किरणाशीं । बोलुं या

बघ सारी ही वनराई
एककाळची शिवशाही ! बोलकी
या कडेकपारीखाली
अन्धारी हतबल झाली । आज ती
कां ? बोल—वाकुनी, खोल—पाहसीं ? तोल
असा जाईल । घसरल्यावरी होईल । काय गे !

ताई:—

घसरल्यावरी व्हायाचें
भाऊ, या काय जिवाचे । एकल्या
होईल जिवाचें सोनें
सोन्याहुनि पिवळें त्यानें । होइल
मातीला मातीमोल
जाउनि हा जीव मिळेल । एकदा
यापरी—स्वर्ग जो दुरी—तोच ही दरी
आणुनी जवळि । घेउनी उदरिं कुरवाळी । जीव हा

भाऊ:—

कां असें बोलसी ताई
बोल हा जिवाला जाई । भेदुनी
जीव काय वरती आला
म्हणुनि काय जाणें त्याला । हें असें
तव जीवित मातीमोल
जाहलें कशानें बोल । या जगीं
लोचनीं—झणीं अश्रुंनीं—साङ्ग येउनी
कशाला दाटी । ही केली कोणासाठी । गे अशी ?

तुज काय, कशाचें, कसलें
जीवाच्या दृष्टिस दिसलें । पाहतां
स्मृति कसली झाली ताई
कीं दिसले 'दादा-आई' । लोचनां
कण्टाळा कसला आला
जीव कां जगाला विटला । यापरी
माहेर—जिवाचें थोर—तूच आधार
तुझ्याविण काही । या जीवा प्रियकर नाहीं । अन्तरीं

**ताईः—**

तुज साङ्गूं कोण्या वचनीं
जाळिते जिवा दिनरजनीं । आंत जें
जन्माला आम्हा घाली
व्यर्थ का जगाचा वाली । ना कळे
शिणभार कशाला केला
कोणाला सुखवायाला । एवढा
सम्पलें—जिवाचें भलें—सार आपुलें
अम्हां संसारीं । नुरल्यावर नातीं सारीं । येथलीं
या शिला डोङ्गरी फार
मजहुनी वाटती थोर । रानच्या
साहती ताप, परि गवतें
हीं परकीं त्यांच्या भवते । उगवतीं
तरु, वेली कोणी कोठे
ममतेचें छत्रचि धरिते । त्यांवरी
ठेवुनी—नित्य कीं मनीं—' शिला ' ही वनीं
प्रभूची करणी । ही सौन्दर्याची खाणी । रानची

निर्जीव जगीं ही रीत
परि अनाथास ना गोत। या जगीं
ममतेचे तुटता बन्ध
दुनियेशीं धरि सम्बन्ध। हें मन
'आम्ही न जगाच्या; जग ही'
परि बोलति 'अमुचे नाही। रतिभरी'
अश्रूंस—अश्रु देण्यास—कुणि नसे ज्यास
कशाला त्यानें। कण्ठणें जिणें अपमानें। भारसें

भाऊ:—

बोलुं नको असलें ताई
तिळतीळ तुटतसे, पाहीं। जीव हा
जीवाचें पाणी पाणी
होई, ही करुणावाणी। ऐकतां
काही तरि धरुनी भाव
जन्माला घाली देव। जीव हा
बिनमोल—आयु हें फोल—जाहलें बोल
सर्वथा कैसें। दैवाच्या घावासरिसें। एक ह्या
तुज दुर्दैवी भगिनीला
मी भाऊ बोलायाला। अश्रुंनीं
असतांना आपण एक
स्वर्गाचें भूवर देख। राज्य हें
तव एक अश्रुचा बिन्दू
साठवील करुणासिन्धु। मन्मनीं
तुजवरी—जीव हा तरी—हृदय कां धरी
भीति जगताची। 'जग तुझें न, तू न जगाची।' हें कसें!

ताईः—

हें तुझ्या धर्मसिन्धूला
जा पूस रूढिबन्धूला । जाउनीं
सुखशील समाजावीण
बोलेल बोल हे कोण । लावुनी
गळचेपी अमुचीं करणें
'धर्म धर्म' यातें वदणें । शोभतें
नाडुनी—सर्व बाजूंनीं—फोल ठरवुनी
जीवितें अमुचीं । अज्ञानदशा कायमची । लाविली
अर्ध अधिक झाली माती
दुर्दैवें असल्या, जगतीं । आमुची
धिक्कार कराया असला
वरि समाज आहे बसला । आणखी
दुर्दैव न येथे सरलें
हाल घरींदारीं, पुढलें । भाग्य हें
अन्धार—भोवती घोर—माजला थोर
किरण ते कुठले । कधि आलें, कधि तरि गेलें । सारखें !
पर्वा न कुणाला त्याची
परि निद्रा ही कायमची । लागली
रविकिरणीं जग हें नटलें
आम्हां न अरुणकर दिसले । अजुनिही
रविकिरणांवरती आशा
परि दैवी नित्य निराशा । ठेविली
वाटतें—विश्व लोटतें—दूर, फाटतें—
हृदय शोकानें । यापरिस 'जिवाचें सोनें' । हें बरें

भाऊः—

तो बोल न आता बोल
तुजविणें जीव राहील । काय हा

तुजसाठी दुनिया सारी
भिजवीन शिम्पुनी वारी । नयनिंचें
हा समाज पाहुनि लाज
वाटते आपुली आज । आपणां
अन्तरीं—आस तूं धरी—शोक आवरी
घसरल्यावरती । साङ्ग मला ताई जगतीं । कोठिल ?

ताई:—

मजसमान अबला गाई
त्या तुझ्याच साऱ्या ताई । मग जगीं
दे अश्रु आपुले त्यांना
त्या मुक्या करुण जीवांना । सत्वरीं
जा, गाउनि करुणागीत
अश्रूंनीं भिजव जगांत । अन्तरें
ना तरी—वाटतें खरी—सुखाची झरी
जिवाचें सोनें । घसरला पाय तर होणें । हें बरें

अन्धार पडे भवताली
काळवण्डल्या ही वेली । तरुंसवें
कण्ठांत मिठी मारुनी
भावण्डें तीं गहिंवरुनी । भेटलीं
तो भक्तिरसाचा पूर
अम्बरास भिडला दूर । जाउनी
गगनांत—करुण हें गीत—कोणसें गात
वदे कीं 'सोनें, । घसरला पाय तर होणें । हें बरें.'

६ मार्च १९२२ सातारा

## ३८ जागेपणचें स्वप्न

[आपल्या आवडत्या बागेंतील लाडक्या फुलवेलीची जोपासना केल्यानन्तर, तिच्याकडे स्वप्नाळू आशेनें पाहत राहिलेल्या एका वधूचें चित्र या कवितेंत रेखाटलें आहे. कालिदासभक्तांना हें चित्र एकाद्या शकुन्तलेचें आहे असें वाटल्यास लेखकाची त्यास ना नाही.]

[ जाति–फुलवेल ]

तुझि ग फुलवेल । त्या अम्ब्यावरति फुलेल ॥ध्रु०॥

भोवतालचीं खणुनी माती
निर्मळ पाणी शिम्पुनि हातीं
वेल चढविशीं ही तरुवरती
रमुनि किति वेळ

अचल लाविसी त्यावरि दृष्टी
ठरली आता, विरली सृष्टी
अता अश्रुची हसरी वृष्टी
होइ कां, बोल

खळींत गालीं भरले सागर
काटा कसला त्यावर थरथर
लाटांवरती लाटा भरभर
उठति का, बोल

दचकलीस कां? दिसलें काही?
अचल दृष्टि कां चळली बाई?
हसऱ्या गालीं लाली येई
कशाची बोल

उघड्या डोळां स्वप्न कशाचें
चित्र कोणत्या तरुवेलींचें
मधुर कोणत्या भाविकालचें
पाहिलें बोल

जुलै १९२१ पुणें

## ३९ बहाणा

[ मनांतून खरें खरें प्रेम असणाऱ्या पण वरून निष्प्रेमाचा बहाणा करणाऱ्या आपल्या भावी प्रियकरणीच्या पदरांत तिच्या प्रियकरानें तिच्या अनुरक्तीचीं प्रत्यंतरें घातलीं आहेत, हीच या कवितेची भूमिका. ]

[ जाति–मोहिनी ]

प्रीति खरी मजवर तव हें काय मज कळेना
वरुनि अता कां तू करिशी व्यर्थ हा बहाणा ? ॥ध्रु०॥

नटविसि मम फुलदाणी तू विविध कां फुलांनीं
गोल मेज भूषविशीं कां स्वकृत रुमालांनीं
आवडे मला त्या चित्रा सजविशीं सुमांनीं
नित्य नव्या भेटी मज कां पाठविशीं नाना ?

आवडेल मज ऐशी कां रचिसि केशभूषा
तोषतेस कां, आभाळी लेवुनीच वेषा
लकब घेउनी माझी कां बोलतेस भाषा
नावडे मला जें, कां तू विटावें तयांना ?

'मुळिं न मला रुचतें तुमचें गान' बोलसीं हें
चिडविण्यांत मजला, गोडी तुला वाटताहे
स्तुतिस्तोत्र माझें तूझ्या मात्र मुखीं राहे
लाविशीं सख्यांना गोडी स्वयें घेत ताना ?

कोपतेस तों, तव गालीं उठतसे खळी कां
खिजवितेस तों विश्वासें नेत्र चमकती कां
लाडकेंच बोलायाला येसि मग पुन्हा कां
        बोलतां न मी, ढाळिसि कां गुत आसवांना ?
भेटवेळ टळतां मम, कां लागसीं झुराया
जिववितेस जीवाला कां पूजुन मम छाया
आणि हळुच मागुन येउन, मागतां पहाया
        लपविसिं ती लाजत कां तू, देत नकारांना ?

२८ आक्टोबर १९२७ सोलापूर

# ४० पूर्णेन्दु

[ गज़ल: वृत्त–वियद्गङ्गा असमग्र ]

प्रीतीची तुझ्या लागे जिवाला लागणी घोर
वाटे अन्तराकाशीं सखे शुक्लेन्दुची कोर
दृष्टी भेटल्या आधी दुरूनी कौतुकें जेव्हा
लाजूनी मनीं झालों कळेना केधवा चोर
होता चान्द बीजेचा, दिसेना चान्दणें कोठे
शोधाया तया लागे मनींची, भावना थोर
लागे ओढणी जीवा, हृदीं जों मोहरे इन्दु
आन्दोले, धरूनी मी तयाचे रेशमी दोर
स्नेहार्द्रून तों वर्षावया लागे सुधाधारा
जादूनें क्षणीं झालें रुपेरी, विश्व हें भोर
येउनी ढगें गेलीं किती ग्रासावया त्यातें
वाढोनी कला, तेजाळला हृत्सिन्धुचा जोर
ठावें हें तुला झाला कसा शुक्लेन्दुचा पूर्ण
आता कां बिलम्बानें जिवाला लाविसी घोर

२७ आगस्ट १९२७ पुणें

# ४१ हृद्गत

[ सुनीत ]

तू येणार म्हणून लोचन तुझ्या मार्गाकडे लागले
देवी, ध्यान तुझें करीत, हृदय प्रीतीमधें भागलें
सङ्गीतध्वनि गोड, दिव्य उठला मद्रोमरोमांतुनी
आनन्दांत विरून जाय मन हें ध्येयावरी गुङ्गुनी
जाईची फुलली मुलायम लता दारीं कमानीवर
वेळा रम्य पहाटची, दरवळे सौगन्ध वाऱ्यावर
होती आरुण कान्तिनें विनटली शुक्रप्रभा मोहक
न्याहाळीत तिला तिथेच ठरलों मार्गप्रतीक्षोत्सुक
होतें खोल किती किती दडविलें मी गौप्य माझें, मनीं
सांगावें तुजला म्हणून पडली मातें किती मोहनी
येतां तू स्मितचन्द्रिका वरसली माझ्यावरी अद्भुत
हातीं मी तव गेन्द तोडुनि दिला, केलें तुझें स्वागत
आता बोलवतें न; काय तुज मी साङ्गू कशी हो गत
पुष्पांनाच विचार; सर्व तुजला तीं साङ्गतीं हृद्गत

१२ आक्टोबर १९२७ पुणें

## ४२ वादळ

[ सुनीत ]

सों सों वाहुन वायु भीषण जवें घोङ्गावया लागला
वेगें हालुन वृक्ष रानभर तों मोडून गेले किती
सोसाटा उठवून धूळ, कण हे वाऱ्यावरी नेतसे
पानें गिर्गिरुनी भयाण गगनीं गेली निघूनी कुठे
वेगें आपटुनी ढगें भरभरा धावूं नभीं लागलीं
गेली गर्जुन तों कडाड बिजली व्योमांतुनी हावरी
धारांचे शर तीव्र वा समरिंचे भाले जणों वर्षले
गारांचा घनघोर मार बसला झाडाफुलावेलिंना !
गेले वादळ ! व्योमही निवळुनी अन्यक्षणीं शान्तलें
फेकी मोहक रङ्ग रम्य गहिरा तेजाळलें अम्बर
नेत्रां तों रमणीय दोन दिसलीं कोनांत एका फुलें
आधारून परस्परांस बसलीं, दैवें असें आणितां !
होतों आपणही सुदूर; जवळी आलों क्षणार्धीं तसे
व्हाया जीवन एक, कारण परी तीं सङ्कटें, राजसे !

१७ सप्टेम्बर १९२८ पुणें

# ४५ भेटीनन्तर

[ सुनीत ]

केव्हां येशिल तू म्हणोनि बघतों मी वाट रात्रन्दिनीं
माझें अन्तर आंतुनी झुरुनिया व्याकूळतें सारखें
दाटोनी कढ तीव्र गूढ हृदयीं वाटे नको मेदिनी
वाढे आन्तर दुक्ख; काय न कळे झालें असें पारखें !
ध्यातों मूर्ति तुझी धरून हृदयीं, नामावली बोलतों
प्रेमें वेढुनिया स्वहस्त चरणीं मी घालितों गे मिठी
त्याहीं भाव निवे न; उत्कट परी जोरांत आन्दोलतो
लागे ध्यास तुझा, जिवा न दिसतें कांहींच दूजें दिठीं
घेवोनि मग छान कागद झणीं आलेखितों अन्तर
प्रीतीचें हितगूज साङ्गत तुला, रङ्गून जातों सवें
वाढोनी परि पूर्वभाव, हळवें हेलावतें नन्तर
'जा भेटून' असें पुन्हा विनवितों, गाळीत मी आंसवें !
येतां तू मन कां उदासुनि परी जातें असें नाकळे
पत्रांतील सुखैकता हरपुनी काव्यात्मता कां ढळे !

२२ सप्टेम्बर १९२८ पुणें

# ४६ सरस्वती

[ सुनीत ]

‘ भेटीनें विरसें कसें मन ? ’ असें चित्तीं उठे काहुर
येती तर्कवितर्क आणि हलती लाटा किती अन्तरीं
किंवा आन्तर दिव्य लावि मजला सौन्दर्य हें हुर्हुर
जातों गुञ्जन कां मनांत न तरी ‘रम्याणि वीक्ष्य ’— स्वरीं !
किंवा बन्धुपित्यासवें स्वभगिनीमातेसवें बोलुनी
जाई वेळ तुझा किती, बहुदिसां ही भेट झाल्यामुळें
पेटे आंत तरीच मत्सर, मला हेटाळणी वाटुनी
रागेजून, उदासतें मन असें प्रेमैकभावें खुळें ?
माझी दृष्ट मलाच काय अथवा ही नाकळे लागतां
हृत्कासार गढूळतें, विमलता लोपूनि गेल्यावरी
येण्याच्या तव कल्पनेंत भरली जी गोड काव्यात्मता
तू आल्यावर हाय ! आटुन कशी ती जाय वेगें झरी
सारे हे मर्निचेच खेळ ! हृदयीं जी निर्मला वाहते—
नित्य प्रीति-सरस्वती, क्षण अशी ती गुप्तता पावते !

२७ सप्टेम्बर १९२८ पुणें

# ४७ भेटवस्तु परत आल्यावर

[ जाति-वैशाख ]

कां विटलें मन माझ्यावरति, राजसे
निष्ठुरता मृदु हृदयीं साङ्ग कशि वसे ? ॥ ध्रु०॥

तव मूकव्रत जाळी निशिदिनीं किती
विरहबाण हृदय त्यांत अचुक विन्धिती
        विमलभाव तुज पटला अजुनि कीं नसे ?
प्रीतिभरें दिधलेल्या भेटवस्तु या
हाय, परत पाठविशीं ! कीं न ये दया !
        काय कथूं अन्तरांत काय होतसे !
व्यर्थच कां शिणविलेंस निष्ठुरे, मला
भासच का ध्यास जो मदीय लागला
        दे प्रकाश वीज तीच मरण देतसे ?
अङ्गारुन अन्तरङ्ग जाय सारखें
कीं तुजला कीव न ये, हृदयहारिके !
        किंवा तें कपटजाल आणि मी फसे !
कायमचें मुख नलगे पाहणें अता
फेकुनि दे भेटवस्तु, जाळ वा स्वतां
        हा फकीर होउन मी चाललों असें !

१४ आक्टोबर १९२८ पुणें

# ४८ वनवासी

[ सुनीत ]

ओढे त्या घरणावरी खळखळा वाहात होते वनीं
सोनेरी किरणांमधें चमकले त्यांचे रुपेरी फुगे
वेलींची खडकांवरी पसरली जाळीं; फुलें त्यांतुनी
वायूसङ्गत हासलीं; परि मला होते न कोणी सगे !
झालों व्याकुळ, हासवूं न शकलीं मातें फुलें हासरीं
सूर्याचे कर मारुनी शर उरीं तों चालते जाहले
दाटे आवस मानसीं; थरकलों, भाम्बावलों अन्तरीं
उष्ण श्वास कितीक सोडित हृदीं दुःखाब्धि हेलावले !
आहे काय असें भयाण जग हें ? थारा न सत्यास कीं
वाढे भेसुरता प्रतिक्षण; कुणा संवेदना साङ्गणें !
नाहीं प्रेमळता कुठे हि ? जळणें कीं मीं असें पावकीं ?
झालों मूढ, गळून अश्रु, गमलें कीं ' फोल सारें जिणें !'
होई तों स्मृति गे तुझी; तुजमधें देवत्व मी पाहतां
स्वर्भू सङ्गमलीं क्षणांत, सहजीं पुष्पावली हृल्लता.

१६ मे १९२३ रहिमतपूर

## ४९ विरहिणी

[ जाति—बालमुकुन्द ]

मज चैन नसे ग कशि मी रिझवूं मना !
घडि घडी मनीं, स्मरण होउनी । सखये, दिन जाइना ॥ध्रु०॥

किति लोचन भरले जातांना येथुनी
किति आंतुन आलें हृदय सखे दाटुनी
परि आवरिलें मन होतें किति आंतुनी
ओतिलें क्षणीं हृदय, घेउनी । बाळाच्या चुम्बनां

किति दिवसां रात्रीं बोलतसूं सारखें
कधि बोल न सरले, वेळ न पुरला सखे
कशि बोलत होतों आणि किती कौतुकें
भाषणीं सुधा पिउनि मी मुधा । न्याहाळी लोचना

कधि ऐकवुनी मज सुन्दर गाणीं जुनीं
कधि नव हृदयङ्गम काव्यसुधा पाजुनी
मज मोहनमन्त्रें ठेवियलें भारुनी
अजुनि ते परी सूर अंतरीं । विरसविती जीवना

कधि माण्डण घरची बघती न्याहाळुनी
सौन्दर्य—सजावट खोलींतिल पाहुनी
प्रिय निशिगन्धा वा वाढवि मी उपवनीं
बघुनि हें, मनीं हसति चोरुनी । हरति किती यातना

कधि लागे हुरहुर काहीतरि अन्तरा
मज शान्तवि माझा प्रेमळतेचा झरा
निरवितां मान मी खान्द्यावरती जरा
चान्दणें फुले त्यांत मन झुले । साङ्गूं परि ग कुणा !

७ नोव्हेम्बर १९२७ सोलापूर

## ५० वियोगिनीचें पुण्यस्मरण

[ जाति–मुद्रिका ]

तव मूर्ति बघूं मी कुठे मधुर हासरी । मधुर हासरी
ऐकाया कोठुनि आता ये तुझी कण्ठबांसरी ! ॥ ध्रु० ॥

किति शून्य भासतें सदन आज तुजविणें । आज तुजविणें
खायास उठति चौबाजू हें नीरस वाटे जिणें
सर्वत्र पसरली येथ घोर अवकळा । घोर अवकळा
तें दीन दिसतसे सारें ज्यांचा तुज होता लळा
आनन्द इथुन लोपला
जों वास तुझा सम्पला !
तावतें ऊन ! कोठुनी सुखाच्या सरी । सुखाच्या सरी
ऐकाया कोठुन आता ये तुझी कण्ठबांसरी !

गरिबींत दाट अन्धार माजला घरीं । माजला घरीं
चान्दणें धवल तव लाभे दृष्टिचें हासरें परी
पावित्र्य नान्दलें थोर पूर्ण मङ्गले । पूर्ण मङ्गले
त्या एकच रङ्गीं सारें संसाररूप रङ्गलें
वाक्सुधा तुझी शीतळ
हृदयास निववि कोमळ

संसारताप शान्तला तुझ्या हृत्सरीं । तुझ्या हृत्सरीं
ऐकाया कोठुन आता ये तुझी कण्ठबांसरी !

अज्ञेयतरूची कळी जरा उमलली । जरा उमलली
स्वरतरङ्गावली किंवा नादून जरा लोपली ?
येउनी शुक्रचान्दणी जरा विलसली । जरा विलसली
झङ्कृती शारदा किंवा पाठवी गोड आपुली
कीं भाक्ति मूर्त ये घरा ?
कीं शान्ति देइ आसरा ?
स्वर्गीय हास्यगीतांत डुम्बलों परी । डुम्बलों परी
ऐकाया कोठुनि आता ये तुझी कण्ठबांसरी !

स्मृतिचिन्हें दिसतीं तुझी किती भोवती । किती भोवती
प्रतिवस्तुंत मजला भासे आस्तित्व, तुझें गुणवति
हीं बाळें प्रतिमा तुझ्या हुबेहुब सखे । हुबेहुब सखे
हासणें बोलणें त्यांचें किति थेट तुझ्यासारखें
हृदयांतहि मूर्ती तुझी
गीतिकाहि तव; नच दुजी
पूजितों आंतबाहेर अश्रुंनीं तरी । अश्रुंनीं तरी
ऐकाया कोठुनि आता ये तुझी कण्ठबांसरी !

३० नोव्हेम्बर १९२७ पुणें

## ५१ पलीकडे

कोणी स्त्री नदीकाठीं येऊन, नावाड्यास 'मला पलीकडे ने' अशी विनवणी करीत आहे, हीच या कवितेची पूर्वभूमिका.]

[ जाति—प्रणयप्रभा ]

घे आतर ने मज परतीरा
जाउं दे घराला जळवीरा ॥ ध्रु० ॥

अफाट तटिनी दुथडी भरली
लाट न तीवरली ओसरली
काय करूं मी येथ एकली
तूच मला आता धीरा
सान्ज टेकली चहुबाजूनें
काळवण्डलीं तरुवर पानें
'किर्र' शद्ब कटु घोषतिं रानें
भीति भरे बघुनी नीरा !
पैलथडी नेउन कितिकांना
थकवा येई तव हातांना
वेध तेथला परि मम नयनां
किती करूं व्याकूळ गिरा !
नको पुसूं स्थिति कां ही व्हावी
तळमळ माझी मलाच ठावी
प्रीतिस पृच्छा कुणीं करावी ?
चल, करिं ही करुणा रुचिरा

६ फेब्रुवारी १९२९ पुणें

# ५२ हृदयदान

[ छन्द--ओवी ]

दान केलें एकदाचें । हृदयाचें जिवेभावें
कीं तू नि मी एक व्हावें

झालों लीन तुझ्यापायीं । माझें सर्वस्व वेंचून
प्रीती साङ्गेल ही खूण

तुज आवडलें जें जें । त्यांत वाटे मज गोडी
प्रीती अशी जिवा जोडी

तुझ्या शुद्धरूपावीण । नाहीं जगीं कुणी माझें
कानीं तुझा ध्वनि गाजे

तुझें गाणें वाजवीतों । माझ्या सारङ्गीवरती
डोळां येतसे भरती

त्यांत वाटे समाधान, । जीव होई एकतान
धन मला माझें ध्यान

वृष्टी करीं, करूं नको । मला नसे मुळीं खन्त
यांतच मी भाग्यवन्त !

२८ आगस्ट १९२७ पुणें

## ५३ ध्यास

[ छन्द—ओवी ]

किति दिन लागे ध्यास । तुझा, व्याकूळलें फार
प्रेम माझें तुझ्यावर

आली अनुभूति मागें । गेलें शहारुनी अङ्ग
झालें तुझ्यामधें दङ्ग

तुझी एक मूर्ति दिसे । गोड माझ्या नयनांला
विरङ्गुळा जिवा झाला

हृदयांत पूजीतसें । तुज प्रेमें आसवांनीं
रमुनिया तुझ्या ध्यानीं

ओठांतून पाझरतें । तुझ्या नांवाचें सङ्गीत
हात तेंच लिहीतात

कुणी काही बोलो, वाटे । मला तुझी गोड वाणी
कानीं माझ्या गाते गाणीं

तुझ्या तालसुरांवर । माझें जीवीत वाहातें
त्यांत अथाङ्ग नहातें

काय पाहूं, काय पूजूं । काय गाऊं, श्रवूं अन्य !
तुझ्यामुळें झालें धन्य !

१७ फेब्रुवारी १९२८ पुणें

## ५४ तुझ्यावांचून

[आपल्या आयुष्यांतील बहारीचे प्रसङ्ग पहाण्यास प्रिय व्यक्ति जवळ नसली कीं काय वाटतें, हें खालील कवितेंत रेखाटलें आहे.]

[ छन्द—ओवी ]

खेळ चाले भोवताली । आनन्दाला येई पूर
पोटीं माझ्याच हुर्हूर
वारा वाहे झुळूझुळू । दाटे फुलांतला वास
नाहीं परी तुझा श्वास
तेज फाके नयनांचें दीप उजळिती सृष्टी
कुठें परी तुझी दृष्टी
चढे रङ्ग गायनाला । माझी लकेरतां तान
परि कुठे तुझे कान
अणूंमाजीं हसे कोन्दे । बहारुनी माझें जिणें
स्मित परी तुझें उणें
आनन्दाश्रू ओघळले । भारावलेल्यांचे किती
कुठे परी तुझे मोती
हृदयांनीं हृदयांत । किती ओतलें अमृत
वाटे, माझें झालें मृत !
करूणल्या तरी माझ्या । आनन्दासवांच्या राशी
बोलूं परी कुणापाशीं !

२० डिसेम्बर १९२८ पुणें

## ५५ स्वरमोहिनी

[ जाति—माधवकरणी ]

जिथे जिथे स्वर तुझा ऐकतों मन तेथे रमतें
पावुनी शान्ति-समाधान
ऐकतांच तो शब्द अलौकिक हृदय उचम्बळतें
होउनी चित्त एकतान ॥ ध्रु० ॥

तव गाण्याचें वेड लागलें केव्हांपासून
म्हणूनी धुण्डितसे सृष्टी
गान ऐकतां ओहोळाचें, स्वर तव भासून
वाटतें होय सुधावृष्टी
वनराजींतिल विहङ्गगीतें थाम्बविती मजला
होतसे काय असें हृदयीं
तुझ्या स्वराची ओळख पटतां, जीव झणीं सजला
गावया गाणीं मोदमयी
जिथे मज सुन्दरता दिसते
तिथे मन लोभुनिया जातें
कणाकणांतुन ऐकूं ये मज तव मञ्जुळ गान
तयाचें मग करितों पान

भयाण रानीं शून्य मनानें बसतां बसवेना
लागतां हृदया हुरहूर
तव स्वरावर पोहत जावें तळमळ हीच मना
लावुनी सुरामधे सूर
तव गाण्याचे आलापिति जे कोणी पडसाद
तयांचे गुणगुणुनी सूर
ध्यान अन्तरीं तुझें स्मरूनी, घालुनिया साद
वेदना मी करितों दूर
सर्वदा एकच लय माझी
रङ्गते वृत्ति तींत राजी
भोळ्या भावांतच मग वाटे मजला आराम
कशाला मग दुसरें धाम

२६ सप्टेम्बर १९२७ पुणें

# ५६ भास

[ जाति—मनमोहन ]

तव भास अन्तरा झाला, मन रमतां, मोहना ॥ध्रु०॥
स्पर्शतां तृणें मखमाली
स्मृति कसलीशी मज झाली
शोधाया त्यांतच लागे मी अपुल्या जीवना
हासतीं फुलें भवताली
मधुर ये फळांवर लाली
स्मितसाम्य तुझ्या अधरींचें मम खिळवी लोचना
वाहत ये झुळझुळ वारा
दरवळका परिमळ सारा
तव हृदयपुष्पगन्धाची अनुभवितें कल्पना
सङ्गीतलकेरी वहरे
आनन्द अणूंतुन पसरे
झङ्कार हृदयवीणेचा तव दे कीं चेतना ?
किति मोहक आरुण कान्ती
मज वेड लावि एकान्तीं
अनुराग तुझ्या हृदयींचा कीं फुलवी मन्मना
तव छाया ठायीं ठायीं
हुरहुरे, बघुन मी बाई
कधि भास सत्य हे होती, मम हरती वेदना !

१० सप्टेम्बर १९२९ पुणें

ग्रंथ संग्रहालय
नं. ......
ता. ......
आ. क्र.

## ५७ मधुरमीलन

[ जाति—मोहिनी ]

मधुर विमल हृदयीं कैशी चन्द्रिका उदेली
काय, कुठुन गोड तुवां ही जादुगिरी केली ! ॥ ध्रु० ॥

वेड एक तव बोलाचें लागलें जिवाला
कान देत बसते नादें शून्य दश दिशांला
बांसरीलकेरीसम तो ध्वनि कसा निमाला !
तरल तरङ्गें ही सृष्टी लहरुन कीं ठेली !

साजली किती हास्याची प्रभा मधुर ओठीं !
तेज माणकांच्या विलसे हेंच काय पोटीं !
मोहनी तियेची चमके लोचनांत मोठी
वेड लावुनी हृदया जी ज्योत नितळ गेली !

तीच तान किंवा भरते अन्तरांत सूर !
तेंच तेज हृदयीं आणी काय अमृतपूर !
कोण ओळखीचें बोले, हासुनी अदूर !
स्पर्श मोहरे कोणाचा ! कोण मला झेली !

१९ ऑगस्ट १९२९ पुणें

# ५८ शूर्पणखा

[ हें स्त्रीगीत ' अहं प्रभावसम्पन्ना स्वच्छन्दवलगामिनी । चिराय भव भर्ता मे सीतया किं करिष्यसि ' या रामायणांतील श्लोकाच्या आधारें रचिलें आहे. वनवासांत रामसीता एकत्र बसली असतां शूर्पणखा राक्षसी उत्तम वस्त्रालङ्कारांनीं नटून, रामाला मोहनी घालण्यास आली आहे; अशा स्थितींत कवितेस सुरवात होते.]

[ जाति–शूर्पणखा ]

गेलें तुझ्यावर जडून । रामा, मन गेलें तुझ्यावर जडून ॥ ध्रु० ॥

किति नटून् सजून् मी आलें
किति अलङ्कार हे ल्यालें
किति नाजूक गेलें बाइ होऊन रामा०

हीं आभाळि वसनें मला
प्रिय तुझ्यासाठी घननिळा
किति घेसी आतां जिव ओढून रामा०

तुझ्या रूपानें मन मोहिलें
तुझ्या पायाशिं तन वाहिलें
चल भेटूं आता कडकडून रामा०

मी प्रभावशालिनि सती
कां सीतेवर धरिशीं प्रीती ?
जिवलगा तिला चल सोडून रामा०

दृष्टि रामाचि स्तिमितचि झाली
सीतामाई हसूं लागली
शूर्पणखा गेली मग चिडून रामा०

धावे खायास मायाविनी
लक्षुमणानें तीं येउनी
परतवीलि नाककान कापून रामा०

१० नोव्हेम्बर १९२५ पुणें

## ५९ वृद्ध भटजी

[ ही कविता म्हणजे श्री. माधव जूलियनूंच्या 'वृद्ध कवि' या कवितेचें विडम्बन होय. मूळ कवितेंत वैशिष्ट्य असल्याखेरीज व ती आवडल्याखेरीज तिचें विडम्बन करतां येत नाहीं. 'None can parody, what he does not love' हें हम्बर्ट वूल्फचें सुभाषितच याची साक्ष देईल. कोणी वृद्ध भटजी एका यजमानाकडे भोजनास गेले असतां तेथील तरुण हातकरू भटजींनीं त्यांना उत्थापन देऊन त्यांचा आदर केला. तेव्हां त्यांना उद्देशून त्यांनीं, पुढील कवितेंत दिलेले उद्गार काढले.]

[ जाति—पळीपञ्चपात्री ]

कां उठतां, खाली बसा तरुणमण्डळी । तरुण मण्डळी
उपचार ठेवितां कां हा, समताच योग्य या स्थळीं
आमन्त्रणि आदर दिसे, न हा थोडका । न हा थोडका
पान्थस्थपणाहुन नाही अभिरुची यांत थोर का ?
भोजनांत आग्रह नको, अहो वृद्ध मी । अहो वृद्ध मी
नव पक्वान्नें खायाची जरि हौस न झाली कमी
जठरींची स्फूर्ति झोपली क्षुधानन्दिनी । क्षुधानन्दिनी
जाहले पराक्रम मागे किति थोर आमुच्या दिनीं

बदलली सृष्टि सम्पले दिवस आमुचे । दिवस आमुचे
नवनवीं किती पक्वान्नें ! पूर्वींचें न कोणा रुचे
मी झालों पिकलें पान आणखी तुम्ही । आणखी तुम्ही
खम्बीर वीर खाणारे; दाखवा जरा रुस्तुमी
भिक्षूक उद्याचे तुम्ही क्षेत्रिंचे खरे । क्षेत्रिंचे खरे
गा क्रान्तीचीं नव गाणीं, घोषवा शब्द 'हर्हरे !'
मज तुमचें भोजनगीत आज ऐकुं द्या । आज ऐकुं द्या
नसणार कदाचित् येथे मी मिष्ट भोजना उद्यां
राहोत पुराणे लोक घरीं स्थिरमति । घरीं स्थिरमति
स्थळ रुचे मला तें जेथे उठतात नित्य पङ्गती
ही जडता जडुं पाहते जेवतां अति । जेवतां अति
वर्धिष्णू यौवन लाभे पुनरपी तुम्हासङ्गती
माउली अन्नपूर्णाच थोर आपुली । थोर आपुली
अन् बाळें आपण सारीं सोनुलीं तिचीं सानुलीं
जेवणें झोडलीं पुरा; भागलों अता । भागलों अता
लागते वामकुक्षीही आग्रहें फार जेवतां
परि नीज यावया श्लोक मधुर गा जरा । मधुर गा जरा
अन् मुखरस वाहुन जातां, वाटेल लाज निर्झरा !

२७ आक्टोबर १९२७ सोलापूर

# ६० संशयरत्नमाला

[ ओळखींच्या सम्पादकांकडे प्रसिद्धीस पाठविलेलें लिखाण निकालावांचून अडकून राहिलेलें असतें तेव्हां लेखकाच्या भक्तीस फारच जोराचा उमाळा येतो. त्यांतून सम्पादक हा इष्टमित्र किंवा निकट स्नेही असल्यास तर त्याच्या पत्राची, लेखक चातकाप्रमाणेंच वाट पहातो. अशाच एका लेखकभक्ताला सम्पादक-देवाचें फार दिवस पत्र न आल्यामुळें, त्यानें त्याच्याविषयीं निरनिराळें तर्क लढवून, त्याला आळविलें आहे. कविवर्य मोरोपन्तांना कोणत्याही दृष्टीनें कमी लेखण्याची मनीषा नसल्यामुळें, मोरोपन्तभक्तांनीं मात्र लेखकास मूळाचा उपयोग केल्याबदल क्षमा करावी.]

[ जाति--आर्या ]

लिहितां बहु त्वरेनें 'लिहितां कोणास ?' हें तुम्हा देवी
पुसती झाली जाणों; पुसतां, ओढील ओळ कवि केंवि ?
कीं कवि–नारद आला, आलापीत स्वकीय सच्चरितें
आत्मस्तुति कोणाला हरि ना ? हरिणापरीस वश करि ते
कीं होतकरू कविंनीं खेचुनि नेलें तुम्हा चहापाना
आणि गळीं उतरविल्या कविता अपुल्या लकेरिंनीं नाना !
कीं हळुवार, प्रेमळ कविपरि मन रङ्गलें चिदानन्दीं
आणि कुणा रसिकाला पाजितसां काव्य आपुलें, बन्दी ?
कीं भीतां, मज एका लिहतां, दुसरेहि लागतील झटे
परि टीकाकारांची गुर्गुर ऐकून काय कवि न हटे ?
किंवा तुम्हांस कविंनीं स्वग्रन्थांची न भेट पाठविली
तरि तेल हें वड्याचें वाङ्मयावर काढण्यास मति झाली !

कीं बहुकाळ विसरला, फारच सङ्कोचला सखा लाजे ?
कवि असुनि लाज उरली ? कर्णा तुमचा न थोडका गाजे
किंवा लिहुनि सुनीतें ठेवियली लेखणी तुम्हीं खाली
वाद करायासाठी काठी किंवा करामधे आली ?
सम्पादकीय खुर्ची किंवा क्षणभर हि ये न सोडाया,
न चुकावी कीं सेवा ? कीं मीं यावें असें न मोडाया ?
कीं सम्पादक तुम्ही— लेखक मार्गांत आडवे आले
नाकारिलेत ज्यांचे लेख तयांच्या पुढे कसें चाले ?
किंवा चुकलें काही स्तवनीं तेणेंचि हात आखडिला
कीं नोटेवर कविता पाठविली नच लिहून, तरि रुसलां ?
कीं लिहुनि जाहिराती आणि तपासूनि मुद्रितें, वाटे
दौतीमधली तुमच्या अथाङ्ग शाई खरोखरी आटे !
किंवा लिखाणपुरुषा ! सम्प्रति बहु भागलांत या कामीं
पडलां दमून नुकते, फोडितसें तोंच काय हाका मी ?
किंवा गचाळ लिहितों आणि असा मी गळयामधे पडतों
सङ्कट पडे तुम्हा हें ? वशिल्याविण मार्ग सर्व परि अडतो.
कीं 'वशिला न जुमाना' त्यासाठी प्रथम वाहिल्या आणा ?
सदया, पुरे प्रतिज्ञा; वर्षद्वय येथलें मनीं आणा
कीं अङ्क दैनिकाचा मोफत मागेन ही मनीं भीती
परि खेळाचे दिवशीं नटमैत्रीला न काय ये भरती ?
किंवा शतपत्रांचा केला सङ्कल्प एक मासांत,
तो सम्पला, अडकलों दुर्दैवें आणि मीच फासांत ?
किंवा कार्यबहुत्वें फावेना एक ओळ ओढाया
फड मारुन वा न्याया, बसलां गप्पा नवीन झोडाया

कीं झाला 'प्र. प्र.' तुम्ही, म्हणुनि सदाचेंच लागलें दार
मोठेपण मिळवाया अभ्यासितसां विशिष्ट आचार ?
कीं मल्लिनाथ--मूल्टन झालों, अवतार--कार्य आवरलें
हें वाटतां जगाशीं अपुले सम्बन्ध काय हो सरले ?
थाम्बे लेखण तुमची आता प्रस्तावना लिही कोण ?
कविच्या पाठीवरली आता उतरील कोण हो गोण ?
किंवा मजहुनि दुसरा कोणी रङ्गेल मित्र आढळला
तच्छुभ--दैवसमीरें त्यावरि करुणाघन प्रभू वळला !
कीं डाकेच्या मार्गीं माझें दुर्दैव आडवें पडलें
अपघात रेलवेला होउनि, येणें न पत्र कीं घडलें ?
कीं नोकर जाईना टाकाया पत्र वागतो स्वैर
न पुसे, न भी, न ऐके, यास्तव दोघांत लागलें वैर
प्रायः सुमुहूर्ताचा शोध करायास लागला वेळ
पञ्चांगांचा तुमच्या बसला नाहीं अजूनि वा मेळ ?
कीं म्हणतसां समर्थोऽहं कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं
प्रतिकारी मित्र तुम्हां देति न किंवा हवें तसें नर्तुं ?
कीं भय बहु दिवसांनीं भेटाया दीन बन्धुला वाटे
पाहोनि सावकारा ऋणकोचें हृदय तें जसें फाटे !
किंवा जेवायाचें दिधलें कोणीं निमन्त्रण प्रेमें
स्नेहमिषें सुचवितसां पक्वान्नांचीं तुम्ही तया नामें ?
'न धरीन लेखणीतें !' का हा धरितां उगाच अभिमान
'शरणागती' लिहाया, करितां कितिदा तरी तिचा मान.
तरि विनवितों उदारा, उचला अपुलें अमोघ तें शस्त्र
संशोधक कुणि छापिल पत्रें मिळवून हींच एकत्र !

१० सप्टेम्बर १९२४ पुणें

## ६१ झुकलेली नौका

[ जाति—स्वर्गङ्गा ]

तुफान दर्या आयुष्याचा खवळुनि गेला अस्मानीं
शिडावीण हें तारूं भडके दुर्दैवाच्या लाटांनीं
गोते खाली वरती खावे हेलकावतां हा जीव
वादळ पिउनी पैलथडी परि जाणारी अमुची नाव
बन्धू-भगिनी एकवटूनी धैर्यानें फोडूं लाट
ललाटरेषा कर्तव्यानें फिरवूं काढुनिया वाट
हृदयीं सत्वगुणास धरूं
एकाकरितां सर्व मरूं
विचित्र हें अमुचें तारूं
कारण पटली परपरांना विश्वासाची खूण मनीं
झन्झावातें जीव रङ्गला, हसे जगाचें कोण गणी !

जननिन्देचे डोङ्गर जाती चाटुन बर्फाचे थोर
मार खाउनी पाणी तोडुनि जाणें परि अपरम्पार
फुटतां तारूं, आकाङ्क्षेच्या फलकाच्या धरुं आधारा
श्रद्धेचा चिर वारा नेइल लोटित आम्हा पैलतिरा
परन्तु झगडुनि लाटासङ्गें कर्तबगारीचे हात--
दोन मारुनी, थडी गाठणें अचुक, अशी अमुची रीत
खाली जळ, वर आकाश
प्रचण्ड लाटांचा घोष
होउनिया परि बेहोष

अफाट मागे, पुढे ! परन्तू कर्तव्याशीं जीवाची
मिळणी होतां भान कुणाला; पर्वा कसली विघ्नांची

चुकुन मिळालों परी जहालों भक्तचि एका साध्याचे
जिरतिल लाटा जळींच, ऐकुनि गाणें दृढ बन्धुत्वाचें
वारवादळें घालुनि पोटीं किती पचविलीं आजवरी
प्रशान्त केले क्षणांत सागर चुम्बुन उचमळत्या लहरी
कवटाळोनी भीतिस, आलें दृष्टिस तान्यासम तेज
अन्धारांतुन नौका नेणें पैलथडी यांतच चीज
दर्याशूर पुढे गेले
अनुसरणें त्यांना ठरले
हो जीवाचें बुरें भलें
गाणें गाउनि कर्तव्याचें लाट पुढें फोडुनि जाणें
झुकल्या नौकेमधेंच जगणें, मरणें आम्हा हेंच जिणें

१३ मे १९२२ रहिमतपूर

## ६२ मूक सङ्गीत

[ जाति–अवनी ]

सूर नको, शब्द नको, थाम्बुंदेत गानें
रवकारी सङ्गीतिं न जीव समाधाने ॥ ध्रु० ॥
ओढ्यांचा खळखळाट
वाऱ्यांची गीत लाट
सकल हे अपूर्ण थाट
आन्तर मज मुग्ध गीत ऐकवूंत रानें
वीणेचा गोड स्वर
प्रीतिगीत शब्दमधुर
वाटतें न पूर्ण, रुचिर
अचल मूक शान्तिसूर हरपवूंत भानें
शब्दहीन गाढ रात
चन्द्रतारका प्रशान्त
तुङ्ग अचल शुभ्रकान्त
श्रवण भरुंत नीरव निज आंतल्या सुरानें
शब्द शब्द, सूर सूर
विरुनि, जिथें शान्ति मधुर
नान्दते अथाङ्ग दूर
माधुरी तियेंतली मिळो नितान्त पानें !

२१ एप्रिल १९२९ पुणें

## ६३ यशस्वी कोण ?

[ सुनीत ]

संसारार्णववीचि घोर उठल्या, वेगांत हेलावल्या
कोठे तुङ्गगिरी, कुठे भयदरी नेत्रा जवें दाविती
त्यांचा खाउनि मार, त्यांतच कुणी आनन्द जे मानिती
स्वत्वाला त्यजुनी गुलाम बनती जे शङ्ख वा शिम्पल्या,
ज्यांना ध्येय न, वृत्ति हीन असती ज्यांच्या सदा आंतल्या
ज्यांना सागर झोकुनी लहरिनें दे वाळवण्टावरी
ज्यांचें तेज असें विसम्बुन सदा सूर्यप्रकाशावरी
त्यांना हें यशवन्त विश्व समजे, कीटांस रूढींतल्या
त्यांचें जीवन फोल; जो परि वसे अज्ञात काही दिनीं
तेजें साठवुनी अतुल्य बनतो जो सद्गुणी विक्रमी
ज्याचें ध्येय उदात्त, सागर परी खाली जया दाबतो
ज्यानें एकच रम्य रङ्ग वरिला बाहेरुनी, आंतुनी
थोडासा धर लाभतां, चुरुनि जो लाटा, स्वपन्थ क्रमी,
अन् सम्राटशिरीं वसे निजगुणें, मोती यशस्वान तो.

२० डिसेम्बर १९२८ पुणें

## ६४ धुक्यांत

[ सुनीत ]

रानें, डोङ्गर, भोवती हिरवळी, ओहोळ उन्चावरी
झाडी दाट, कडे भयाण मधुनी रेखीव रस्ता असे
काळे मेघ नभीं, दऱ्यांमधि धुकें; येतां वरोनी सरी
गेलें अङ्ग भिजून; पूर हृदयानन्दास तों येतसे
आल्या तोंच चळा, सरीवर सरी; वाफा तयांच्या किती
कङ्गोऱ्यावरुनी सुसाट पळती वाऱ्यासवें सुन्दर
पायीं छुमूझुमवीत नूपुर वरी कीं अप्सरा धावती
दाटे शुभ्र धुकें; क्षणांत उरलों मी अन् पयःसागर
वृत्ती तों स्थिरल्या गभीर बघुनी खालीवरी शुभ्रता
" खेळे कोण असें ? कुणास्तव बरें तें विश्व चेतोहर
येथे कोण धनी ? कुणास्तव असे गम्भीर ही दिव्यता?"
बोलें आणिक दृष्टि आंत वळवी शोधावया अन्तर
माझें तेज मला विराट दिसलें ! सृष्टी पुन्हा हासली
चैतन्येंच नसानसांत तिचिया माझीं मला भासलीं

३१ जुलै १९२३ पुणें

## ६५ देवि क्षमे !

[ सुनीत ]

स्वार्थी ठेवुनि घोर दृष्टि अपुल्या सद्बुद्धिला जाळुनी
दुष्कर्मांत मजेंत जे निशिदिनीं संतोपुनी रातले
त्यांना निष्ठुर सङ्कटांत जग जों मारावया मातलें
तच्चित्ता अनुताप तूं घडविला. पापानलीं पोळुनी--
झाले तेहि विशुद्ध; पाजुनि सुधा देवी तुवां हासुनी
औदार्यें जननीपरी निजकरीं सानन्द कुर्वाळिलें
हृद्वेदीवरती पवित्र जळ तूं ऐसें सदा शिम्पिलें
झाले पाप अपाप सर्व, तरले अन्यांसही तारुनी
वाटे विस्मय हा परन्तु मज कीं, जे घोर याहून ही
ज्यांना स्वार्थ न वा परार्थ, छळिती अन्यास निष्कारण
पश्चात्ताप जयां कधी न शिवतो, जे लाजवीती खला
ज्यांना नीति न दण्डिते, रडतसे ज्यांच्यामुळें ही मही
त्यांना देउनि कां सुधा न करिसी दुष्टत्व-निर्मूलन ?
जें झाल्यावर दिव्यलोकसमता येईल या भूमिला !

२४ एप्रिल १९२४ पुणें

## ६६ गोफ

[ विषण्ण मनाची तळमळ आकाशांत दिसणाऱ्या उद्बोधक दिव्याभासांनीं क्षणभर थाम्बते; पण ते नाहीसे झाल्यावर मनाच्या तळमळीची तीव्रता अधिकच वाढून, त्याला इथे चाचपडत रहावें लागतें; मानवी जीवितांतील हेंच कटु सत्य पुढील कवितेंत चित्रित केलें आहे.]

[ जाति--कोकिळा ]

'तरङ्गुनी अम्बरीं ऊठ ये तरङ्गुनी अम्बरीं' ॥ध्रु०॥
रुचिर रङ्गले समोर अम्बर
साञ्जमेघ हे खुलले सुन्दर
अस्तगिरीवर उतरे भास्कर
सुरेल वायू बोले मञ्जुळ वाजवुनी बांसरी
दूर पसरले ढग सोनेरी
हेलकावती जवळ अञ्जिरी
किनार चमके त्यांत रुपेरी
धूसर त्यांतिल बोले, मुद्रा करुनि कुणी हासरी
शुभ्र ढगाच्या चौरङ्गावर
विलसे मखमाली जरतार
प्रभावळीचें तेज अपार
तेजःपट मागून फाकले, शब्द उमटले वरी
लेउनि पिवळ्या तलम मलमली
कुणी मोतिया कुणि आभाळी
कुणी पोपटी कुणि सोनसळी
दिव्य अप्सरा गोफ खेळती नादवुनी नूपुरीं

सिंहासन परि रितें राहिलें
आणि खिन्न मज कुणीं पाहिलें
गीतांनीं मन्मन मोहविलें
तेथ बसाया मज बोलविलें पालवुनीया करीं
गोफ रङ्गला रङ्ग मिसळले
भान कशाचें तयांस उरलें
एकच नादीं जीव रङ्गले
प्रतिध्वनींतुनि त्याची उठली एकच मग वैखरी
जगास विटलेलें माझें मन
जड झालेलें सोडुनि जीवन
वरी विमानापरी तरङ्गुन
अज्ञाताच्या नादीं चाले गुङ्गत एक स्वरीं
उचम्बळोनी गेल्या लहरी
शोभा अवलोकुनि ती गहिरी
आतुर झालें गगनविहारी
रङ्ग फिकटले तोंच, थाम्बले शब्दहि वाऱ्यावरी
भरभर धावे पुढे पुढे मन
विरूं लागलें रङ्ग मिसळुन
काळवण्डलें तो सिंहासन
दृश्य लोपलें झणीं, राहिले बोल मात्र अन्तरीं
अस्तगिरी मग दिसे भयाण
अन्धारांतुन गिरक्या घेउन
ठाणावर ये हळूहळू मन
नैराश्यानें गात बैसलें गाणें हें बेसुरी
२१ आक्टोबर १९२४ पुणें

## ६७ मनाची आग

[आपण दुक्खांत असतां, आपणांकडून इतर लोक मात्र सुखाची अपेक्षा करतात. अशा वेळीं आपल्या तितिक्षेचा अर्थ काय असावा, हें पुढील कवितेंत साङ्गितलें आहे.]

[ वृत्त--आनन्दकन्द ]

ही आग पेटलेली माझ्या सभोवताली
हैराण या जिवाची होते किती कहाली !
सारावया तमाला येईल तेज वाटे
ज्वाळांत या परन्तू माझी तनू जळाली
माझ्या मनीं कळ्यांनीं कोठे जरा फुलावें
जावें परी जळूनी केव्हां असें अकालीं !
कीं पालवून आशा आनन्द मोहरावा
तों कोवळे मुगारे अङ्गार, हाय, जाळी !
स्वार्थांत लोभलेले हे कीट जीव खाती
ध्यावें कुणास आंतां, जीवास कोण वाली ?
देऊनि वीष मातें पीयूष ओपण्यातें
हे साङ्गती; न पाहे अश्रू कुणीच गालीं !
किंवा जळून ऐसें पावित्र्य मेळवावें
अन्यास तेज द्यावें चाले तरी ल्यारी ?

२ मे १९२५ रहिमतपूर

# ६८ भयाण समुद्रांत

[ आयुष्याचा बराचसा मार्ग कण्ठल्यावर, आपणांस आपल्या अपेक्षांच्या उलट पण कटु असे अनुभव येतात. त्यावेळीं मन वावरून जाऊन, एकाद्या भयाण समुद्रांत सांपडल्याप्रमाणें आपणांस कसें वाटतें, हें खालील कवितेंत रेखाटलें आहे. ]

[ वृत्त-ताराज त्रियद्गङ्गा ]

हा हाय ! कुठे जाऊं ! डोळयास दिसेना तीर
कोणास कसा बाहूं ! जीवास मिळेना धीर
लाटावरती लाटा खायास पुढे येती
बेफाम किती वारे घोङ्गावति हे भिर्भीर
सानन्द निघालों मी घेऊन कितीकांना
ते सोबतिचे गेले ! किंवा फिरलें तग्दीर
विश्वास दिला, प्रेमें ज्यांना धरिलें पोटीं
साशङ्कच ते झाले, अन् व्यापि धुकें हें नीर
शत्रूंसह झुन्जा मी खेळून किती आलों
हे सोसति मित्रांचे आता न विषारी तीर
खालीवरती जावें हेलावुन लाटांनीं
आराम जरा घ्याया हें टेकवुं कोठे शीर
मागे न पुढे भोती दृष्टीस दिसे काही
गात्रें थकुनी गेलीं, होतीं न मुळीं सुस्थीर
कर्तव्य दिलेलें तूं सश्रद्ध करायातें
निष्कामपणें आलों; नेणार पुढे तूं वीर

३ फेब्रुवारी १९२९ पुणें

## ६९ तळमळ

[ कधी कधी मनाची अकारण विलक्षण तळमळ होते व कारण तर कळत नाहीं. या स्थितीचें चित्र पुढील कवितेंत आहे. ]

[जाति— वधूवल्ली]

उन्मन व्हावें । व्याकळून त्यांतच जावें ! ॥ध्रु०॥
काय जिवाला हवें कळेना
आशेला अपुलेंहि मिळेना
कृतीस काहीच आकळेना
आंत जळावें । व्याकळून त्यांतच जावें !
एकाएकीं ढग हे येती
तळमळ अन्तरिची वाढविती
अश्रुसरी किति मग कोसळती
त्यांत भिजावें । व्याकळून त्यांतच जावें !
धुकें दाटलें चहुबाजूंला
लाटांनीं सागर फेसळला
पैलथडीची आस कशाला !
हाकारावें । व्याकळून त्यांतच जावें

भयाणता भवती वावरते
सारङ्गींवर बोट न फिरते
काळिज आंत असें चिरचिरतें
कोमेजावें । व्याकळून त्यांतच जावें
या ताऱ्यांतुन त्या ताऱ्यांतुन
पुष्पांच्या नाजुक सृष्टींतुन
उगिच फिरावें, कढुनी आंतुन
शान्त न व्हावें । व्याकळून त्यांतच जावें
बोल फोल का मग बोलावे ?
अनुभूतीविण कां डोलावे ?
किति दिन ऐसें आन्दोलावें ?
कुणा साङ्गावें । व्याकळून कुठवर जावें ?

१२ फेब्रुवारी १९२५ पुणें.

## ७० मुरली

[ जाति — मनमोहन ]

तुझि मुरली मधुर मुकुन्दा मज ऐकूं दे जरा ॥ध्रु०॥
मज तहान कधिची लागे
म्हणुनि ही सुधा तुज मागे
निज मधुर स्वरपीयूषें झणिं जिववी ही धरा
हृदयांत उठे जो नाद
द्यावया तया पडसाद
सङ्गीत घुमवि अधरानें मृदुभावें सुन्दरा
लागुनी तीव्र हुरहूर
अन्तरीं खळाळे पूर
करिं शान्त सूरजादूनें हृदयाच्या सागरा
हृदयाचें हरिसी गूज
ठाऊक कसें तें तूज
अङ्गुलिनें आळवि त्याची मृदुभाषा सुस्वरा
पीत ती शान्त चिरकालीं
झोपेन तुझ्या हृत्कमलीं
वायूंत माधुरी जाई जशि मिळुनी, बन्धुरा !

५ जुलै १९२८ पुणें

## ७१ याचना

[ अभङ्ग ]

किती करूं आळवणी    कधीं येई करुणा मनीं
तुझ्या गोड बोलाविण    जीव जाहला हैराण
चौदा पाऊस वर्षले    प्रेमरोप जोरावलें
आता जगीं मी एकला    साहे कैसा बोल मला
देह दोन मन एक    झाली जीवा आणभाक
पोटीं दुःखाचे उमाळे    जगीं प्रेमाचे उन्हाळे
साङ्गू कुणा बोलूं काय    जिवा लागली ही हाय । किती०

कडे डोंगर पठार    नद्या ओहोळाची धार
वृक्ष वेली वा पांखरें    बोल बोलती हे वारे
खेळूनीया गीतें गाती    मन रिझवूं पहाती
परी गोड तुझा ध्वनि    कानीं येईना त्यांतुनी
चित्त लागेना त्या गानीं    ध्यास एक तूझा मनीं
बोल नाहीं तुझा तरी    शून्य वाटे विश्वावरी
पोटीं कढावरी कढ    येतां जातां झालों मूढ
साङ्गू कुणा बोलूं काय    जिवा लागली ही हाय ! किती०

कन्दरीं वा कड्यावरी	डोङ्गराच्या टोकावरी
कुठे एकलें बैसावें	वेडेंपिसें जीवें व्हावें !
ग्रह चन्द्र सूर्य तारे	येती जाती क्रमें सारे
अन्तरीचें दुःख परी	कोण जाणे हें अम्बरीं
जो तो स्वतांशीं रङ्गला	जीव तरी वारा प्याला
माया केली का पातळ	कोण शान्तवी हा जाळ ?
जीवसख्या, माझें कोण	साङ्ग आतां तुझ्यावीण ?
साङ्गू कुणा, बोलूं काय	जिवा लागली ही हाय ! किती०

२० एप्रिल १९२१ महाबळेश्वर

## ७२ संसारवन

[ अभङ्ग ]

काटेकुटे रानीं किती या माजले
फुलांचे साजले वृक्ष परी

दगडधोण्ड्यांला पाय ठेचाळती
हिरवळ मोती परी मऊ

हिंस्र आरोळ्यांनीं जरी रान भरे
निर्झरपांखरें गातीं इथे

प्रखर उन्हानें तापे रानकाया
परी गार छाया कुठे भारी

संसाराच्या रानीं दुक्खसुख ऐसें
ठेविलें आपैसें दयाळा तूं

कशासाठी बोल लावावा मीं तुज
सापडतें गूज, नीट जातां

२३ आक्टोबर १९२८ पुणें

# ७३ ध्यान

[ अभङ्ग ]

संसारतापानें जीव जधीं पोळे
कृपामेघ वोळे तेव्हां तुझा
त्रासूनिया कोठें ओळ्याकाठीं जावें
ध्यान एक ध्यावें तेथ तुझें
जळाची खळ्खळ, झाडांची पालवी
जिवाचा घालवी ताप दूर
ध्वनि गोड तूझा ऐकूं येई त्यांत
रूप फुलोऱ्यांत दिसे तुझें
गायक तू थोर, सौन्दर्याचा ठेवा
नाही शान्ति जिवा तुझ्यावीण
शान्तवाया मन एक तुझ्याठायीं
जीव धाव घेई म्हणूनीया

२९ मे १९२४ रहिमतपूर

## ७४ ओलावा

[ अभङ्ग ]

जाईना ही काय करूं जळजळ
होई तळमळ पाण्यावीण
'परवां परवां' म्हणतांना किती
गेले दिस मिती नाही तया
पाहवेना मागे, काचतें अन्तर
काय अनन्तर समजेना
वाहूनीया तूज आता भावभक्ति
सोडितों आसक्ती चञ्चलाची
रानफुलामधे, रङ्गीन ढगांत
बैसेन पहात रूप तुझें
सर्वभूतीं भावें धरीन मी प्रीति
सञ्चित या रीति उजळीन
परी व्हावा तुझ्या कृपेचा ओलावा
कशाला तोलावा अर्थ त्याचा

२८ आगस्ट १९२७ पुणें

## ७५ हुरहूर

[ अभङ्ग ]

होतसे कां ऐसें चुकल्यासारखें
जाहलें पारखें काय नेणें !

हुरहूर वाटे सान्जावतां भोती
मन्दावली ज्योति अन्तरीची

काळोखाचें रान माजे मजवर
भोवताली वर काजळलें

वारा गुणगुणे गीत काहीतरी
अन्तरीं बांसरी मूक झाली !

बसून कातळीं इथें मी एकला
कुठे पाहूं तुला दिगन्तरीं !

१८ फेब्रुवारी १९२७ पुणें

ग्रं. नं. ता.

## ७६ सम्भ्रम

[ अभङ्ग ]

रिझवाया मन व्याकूळ, एकटा
पाहे चहूंवाटा खालीवरी
आकाश धरेला समोर भेटलें
ताऱ्यांचें नटलें जरा तेज
गम्भीरतेमाजीं काळोखापल्याड
काय तिथे गाढ भावे जीवा !
तिथेच कां लागे एकतान दिठी
हुरहुर पोटीं दाटूनीया !
तूच का असल्या स्वरूपीं विराट
राहसी सम्राट, तेजोनिधे !

१८ फेब्रुवारी १९२७ पुणें

## ७७ तुझें औदार्य

[ अभङ्ग ]

तुझ्या औदार्यास नाही पारावार
भेद सानथोर आम्ही करूं
सुन्दर विश्वाची करूनी घडण
चैतन्याचे कण ठेविले तूं
ठेवियेली तूंच आम्हापुढे सृष्टी
आणि अंतर्दृष्टी तूंच दिली
परी धुक्यामाजीं तीच होय मन्द
सम्पले सम्बन्ध परोक्षाचे
औदार्याच्या गोष्टी म्हणूनीच बोलूं
आणि आम्ही तोलूं एकमेका

२५ मार्च १९२४ पुणें

## ८० माहेर

[ अभङ्ग ]

अजून हा ओढी जिवा गोतावळा
जरी न जिव्हाळा दावी कोणी
किती भोवताली पेटविती आग
जिवा जागोजाग भाजूनीया
अन्तराला घोर बसती चटके
दिसतां लटकें जग पुढें
तरी माझी वेडी पोटाग दुबळी
तयांच्या भोताली गिरगिरे
सापडलों पुरा तरी खातों गोते
कशाला नको तें देसी मज
यांतुनी तू आता काढूनी बाहेर
दाखवी माहेर मज माझें

१७ जानेवारी १९२९ मुम्बई

## ८१ पाठीराखा

अभङ्ग

कुणाचा मी कोण मनास विचारी
नाही घरीं दारीं कुणी माझें
अन्तरींच्या कळा बोलूं कुणापाशीं
जेवून उपाशी सदाचा मी
पेटलेला जाळ कसा मी शान्तवूं
कुठे मी निरवूं अन्तरातें !
कधीं हृदयींची सरे हुरहूर
थाम्बावें आतूर किती दिस
ये ये एकदाचा तूंच माझा सखा
तूंच पाठीराखा जीवनीं-या

२१ आक्टोबर १९२७ पुणें

## ८२ उपरति

[ अभङ्ग ]

किति दिन गेलों तुज विसरून
जीवित झरून चाललें हें !
फोल थोरवीचा भरे अङ्गीं ताठा
अहन्तेचा साठा करुनीया
ऐश्वर्यांच्या रङ्गीं धुन्दलें हें मन
चञ्चलांत तन गुन्तूनिया
माझीया तेजानें केलें मज अन्ध
दिसेनात बन्ध भोवतीचे
ऐकतां कुणाची मृत्युशोकवाणी
होय पाणी पाणी जिवाचें या
आता सर्वकाळ देई ही जाणीव
शिकवी सानीव तुझ्या पायीं

२७ आगस्ट १९२७ पुणें

## ८३ वैराग्य

[ अभङ्ग ]

अनन्त काळाचा अफाट हा सिन्धु
लागे नाव हिण्डूं त्याजवरी
त्रिकाळ या लाटा तडकलें बूड
भरारली सूडवृत्ति आंत
बुडत चालली नाव खाली खालीं
पाणी भोवताली पायतळीं
क्षुद्र अनित्याचा धरुनी मीपणा
तरी प्रतिक्षणा भाण्डूं आम्ही
निखवे वैराग्य तापतां हें मन
वाटतें ' जीवन नको येथ '
सम्पवी तू तरी आता येरझारा
तुझ्या पायीं सारा भाव माझा

२५ डिसेंबर १९२७ रहिमतपुर

## ८४ विसावा

[ अभङ्ग ]

कासया हें डोळा दाटतसे पाणी
कशासाठी वाणी गहिवरे
कुठे अवकाशीं पाहूं तुझें रूप
जिवाला हुरूप किती धरूं !
शून्य दृष्टी लावी सारखी आकाशीं
आणि तुझ्यापाशीं जाई मन
चन्द्रताऱ्यांतून तेज जें दाटलें
तिथे का साठलें रूप तूझें
मन्दाकिनीकाठीं किंवा बसूं साङ्ग
आणि यथासाङ्ग पूजूं तुला
नको जिणें येथ; जीव हा दयाळा
एक विसावला तुझ्या पायीं

१० जुलै १९२६ पुणें

## ८५ समाधान

[ अभङ्ग ]

आतां कळों आलें तूंच एक वाली
जिवा सर्वकाळीं, दयावन्ता
व्यर्थ जमविलीं माया भोवताली
स्वप्नें उभविलीं हाय सारीं !
जिवाचे जिव्हाळे दाविती उन्हाळे
कशाला हें जाळें विणूं आता !
मुरडोनी मन जाहलें व्याकूळ
तोंच आली शीळ ऐकूं तुझी
वृत्ति लीन झाल्या एक तुझ्या ठायीं
आणि गान गाई जीव तुझें
ध्यान लावोनिया त्यांत मी रङ्गतों
अन्तरीं निवतों तुझ्या कृपें

६ जुलै १९२६ पुणें

## ८६ आभार

[अभङ्ग]

किती मानसीं मीं आभारावें तुला
करावासा खुला गळा वाटे
दुष्टाईची भोती ठेवूनिया माया
तियेची न छाया पडूं दिली
खारट सागरीं दिलें पाणी गोड
गानाची वा जोड घोर रानीं !
मात्र भिववोनी सारखें जीवातें
पुढील मार्गानें जाणविलें
आणि चाङ्गल्याचे घ्यावयास गुण
अन्तरीची खूण दावियेली
वाहलों असतों कुठे नाही तरी
कृपेच्या पांखरीं झाकिलेस
कैसें व्हावें तरी आता उतराई
येतों तरी पायीं भारावूनी

२७ ऑगस्ट १९२९ पुणें

## ८७ मनीषा

[ वृत्त-भुजङ्गप्रयात ]

तुझें रूप डोळां सदा आठवावें
तुझें ध्यान चित्तामधे साठवावें
सदा लावुनी जीव हा एकभावें
तुला अन्तरीं प्रीतिनें मीं पुजावें

तूझें नाम वाचे वदावें सदा मी
चिदानन्द घ्यावा तुझ्या एक नामीं
तुझ्या प्रीति-वीणास्वरा सूर द्यावा
तुझें गान व्हावें जिवाचा विसावा

तुझी कल्पना, भावना मीं लिहावी
तुझी गूढता अन्तरीं ओळखावी
तुझ्या एकरूपीं स्वयें लीन व्हावें
तुझ्यावीण कोठे न काही दिसावें

५ फेब्रुवारी १९३० पुणें

## ८८ कृतज्ञता

[ जाति–दिण्डी ]

पोर खाटेवर मृत्युच्याच दारा
कुणा गरिबाचा तळमळे बिचारा
दूर आई राहिली कोकणांत
सेविकेचा आधार एक हात !
ताप त्यानें भरतांच तडफडावें
पांखरानें एकलें फडफडावें
हळू गोन्जारी सेविका दयाळू
डाक्तराचें वच शान्तवी कृपाळू
कधी त्यानें घ्यावें न मुळीं अन्न
कुठे डोळे लावून बसे खिन्न
आणि डाक्तर येतांच गोन्जराया
हाय ! लागे तो घळघळा रडाया
एक दिन तो व्याकूळ फार झाला
आणि त्यानें पुशिलेंच डाक्तराला—
'अता दादा मरणार काय मी हो ?'
तोंच लागे अश्रुची धार वाहों

हृदय हलुनी डोळयांत उभें पाणी
तरी डाक्तरची वदे करुण वाणी
दोन गोष्टी साङ्गून धीर देई
पुन्हा गोन्जारुन शान्तवून जाई
रात्र अन्धारी माजली भयाण
सोसवेना जीवास अता ताण
हलुच बोलावी बाळ डाक्तराला
तोहि धर्मात्मा धावुनीच आला
अता बाळाला टोचणार तोंच
वदे वासुनि पांखरूं दीन चोंच—
'नको आता...उपकार फार झाले !
तुम्हीं..मजला किति...गोड...वागविलें
भीत...दादा...मरणास..मुळी...ना...ही !
तुम्ही..आ...ई !' बोलला पुढे नाहीं
झणीं डोळे फिरविले बाळकानें
आणि पुशिलीं लोचनें डाक्तरानें !

२५ सप्टेंबर १९२५ पुणें

## ८९ दोन देवी

[ जाति–स्वर्गङ्गा ]

दर्या हेलावुन फेसाळे ! अन्धारुन अम्बर गेलें
लाटांच्या शिखरांवर नौका खालीवर कलुनी हाले
शूर शिकन्दर धीर धरुनि तो सावरि नौकेचे झोके
हताश झाला ! काचावें मन अखेर पाहुनिया धोके !
वल्हीं मारुनि दोंहातांनीं, आर्ताश्रूंच्या वृष्टीनें
नावेमधल्या जीवांसाठीं देवा आळवि दृष्टीनें
तोंच प्रगटुनि अन्धारांतुन तेजस्विनि कोणी देवी
मोरासह नावेंत उतरली; घेइ करीं वल्हें तेवी
देउनि अपुली गोड बांसरी त्याला 'वाजविं ही' बोले
आणि वल्हवुनि नौका आपण तालावर हाले डोले
ओठामधुनी सूर निघाले मञ्जुळ, सागर तों स्थिरला
सोसाट्याच्या वाऱ्याचा स्वर भेसुर कोठेसा विरला
भर भर चाले नौका आणिक बहर पातला गाण्याला
रात्र ओसरे, फुटे ताम्बडें काटित जातां पाण्याला
अन्य देवता कुणि तों वरुनी ताम्बुस रङ्गांतुन आली
उचलुन नेई त्यासच वरती, नौका सरळ पुढे गेली
मात्र अम्बरीं शब्द नादले ' देवि, कोण तू ? ती कोण ?'
'मी शान्ती, ती सखी शारदा !'–सागर हसला ऐकून !

२६ सप्टेम्बर १९२५ पुणें

## ९० माझीं माणकें

[ जाति–दिण्डी ]

“सहज त्यानें भाण्डार दाखवीलें
हिऱ्यामोत्यांचें तेज फाकलेलें
दिमाखानें दावून माणकें तीं
वदे ‘शोभा हीं कीं न घरा देती !’
सखे, विभवाचा वीट मला आला
आणि तिकडे मीं फिरविला न डोळा
परी काव्यें काढून सुरस काही
पुढे माझीं माणकें ठेवि मी ही
पुसे त्याला ‘जी सुधा पिउनि धाले
लोक ज्यांच्या दीप्तिनें चकित झाले
अशीं माझीं माणकें दिव्यकान्ति
घरा शोभा नच काय अधिक देती !’
ऐकुनी हें विरमला तो मनांत
साठला गे आनन्द अन्तरांत;
आणि पुसतों तुज सखे, अता तेंच
‘घरा शोभा कोणती याविणेंच ?”
प्रश्न ऐकुनि ती झणीं आंत गेली
आणि बाळें घेउन तीन आली
पुढे करुनी शशि-हेम-वसुमतींला
उलट मज तोच प्रश्न तिनें केला !
सुतेजस्वी माणकें गोजिरीं हीं
बघुनि मीही तिजपुढें लीन होई !

९ फेब्रुवारी १९२५ पुणें

## ९१ सौभाग्य

[ जाति–दिण्डी ]

उन्हाळ्याची ती ऐन भर दुपार
रूक्ष वारे तापले त्यांत फार
घाम निथळत येऊन उतारांत
सखीसह मी गाडींत बसे शान्त
माळरानें ओसाड गुर्जरी तीं
झळा-गर्दीनीं निमालीच शान्ती
होय पाणी पाणी, न सुचे कांही
रीघ हलण्यातें मिळालीहि नाहीं
तोंच तरुणी गतधवा कुणी आली
आंत येउन दारींच उभी ठेली
उठे मी तों, ती टेकली समोर
शीट झाली, चाललों दूर दूर
जरा झालें स्थिर, तोंच भिकारीण
कुणी उठली मुखिं गीत गात दीन
येइ लावित भगिनींस कुङ्कु हातीं
खेळ पोटास्तव ! थांम्बली क्षणान्ती

तिलक सखिच्या रेखिला तिनें भालीं
एक पैसा घेऊन ती वळाली
पुढे गेली–ठावें न, कसें झालें–
तिनें कुङ्कूं विधवेस लावियेलें !
हाय ! झालें तों चर्र काळजांत
स्तिमित झालों दुर्दृश्य हें पहात
देवता ती–तिज काय मनीं झालें
कसें साङ्गूं हृदयास जें कळालें ?
तिची भालीं अङ्गुली हळू गेली
जळें भरलीं नयनांत पोळलेलीं !
हाय ! अमुचीं लोचनें तों मिळालीं
आणि त्यांमधुनी आसवें गळालीं !

२६ एप्रिल १९२३ मुम्बई

ग्रंथ संग्रहालय
नं.
वा.
ठाणे

## ९२ क्षणाचाच विलम्ब

[ जाति-दिण्डी ]

शिरीं धोण्डा लागून जखम झाली
आणि फान्दीवरुनि ती पडे खालीं
तिचा जिवलग धावला सावराया
तीहि तडफडुनी लागली उठाया

जवळ कोठे त्याला न दिसे पाणी
आंत ओढूं लागली तिची वाणी
थेम्ब आणाया जळाचा कुठून
जरा कष्टानें–जाय तो उडून !

एकली ती, पाहून भोवताली
हळू चिवचिवली, व्याकळून गेली !
कण्ठ पाण्याविण शोषुनीच गेला
त्यांत अन्तर्वैरीच सखा झाला !

चोंच वासुन, ताठले पङ्ख पाय
आणि अस्ताला सूर्यबिम्ब जाय !
तोंच घेउन चोंचींत जळें येई—
तिनें त्याला परि पाहिलें हि नाहीं !

२० मार्च १९२४ पुणें

## ९३ गानमोहिता

[ ही कविता म्हणजे स्वामी विवेकानन्द यांच्या जीवनांतील एका रहस्याची स्मृतिच होय. नरेन्द्र–या वेळीं एम्. ए. च्या अभ्यासासाठीं कलकत्त्यास एका रस्त्याकडेच्याच खोलींत रहात असे. सकाळीं–सायङ्काळीं नित्य तम्बोऱ्यावर आपल्या मधुर कण्ठाचे आलाप छेडून, एकतान वृत्तीनें गात, ध्यान करावें हा त्याचा क्रम असे. तो गाऊं लागला कीं समोरच्या घरांतील एक गतधवा तरुणी आपल्या दारांत येऊन उभी राही व त्याच्या गाण्यांत रमून जाई. एक दिवस नरेन्द्र गाण्यांत पूर्ण रङ्गला व ती तरुणी आपलें देहभान विसरून, आपलें घर सोडून त्याच्या खोलींत येऊन समोर उभी राहिली. गाणें सम्पल्यावर नरेन्द्रानें तिला पाहिलें व 'आपण इथे कां आलां' वगैरे विचारलें. 'माझें आपणांवर प्रेम जडलें आहे; आपण मजशीं विवाह करून संसार करावा, ही प्रेमयाचना करण्यास मी आलें आहे' असें ती म्हणाली. नरेन्द्रानें तिच्यापुढे साष्टांग नमस्कार घातला व 'तू मला भगिनीसमान आहेस' असें साङ्गून तिची समजूत घालून तिला परत पाठविलें. नन्तर त्यानें ती खोली तत्काल सोडली. पुढील कवितेंतील संवाद या सत्यकथेवर आधारलेला आहे. ]

[ जाति–बांसरी ]

कोण तू कुठोनि येसि, कां हळूच मन्दिरीं ?
मोहवी मनास रम्य हास्यतेज सुन्दरी ॥ ध्रु० ॥

तू सती जगांतली
अप्सरा नभांतली
स्वर्गदेवता सजून येसि वा धरेवरी !

चञ्चला दृगांतुनी
मोहिनी प्रभेंतुनी
विलसतेस कीं उषाच मूर्तिमन्त माधुरी !

मञ्जु गान रङ्गलें
एकतान, मङ्गले,
प्रकटलीस त्यांतुनी सुरेल रागिणी खरी !

सुन्दरी वसुन्धरा
पातलीस मन्दिरा
काव्यभा प्रसन्न वा विराजलीस ईश्वरी !
अन्तरङ्गमाधुरी
रङ्गली मुखावरी
काय गे तरङ्गती तरङ्ग कोमलान्तरीं !

कोण तू०

हाय ! गीत ऐकिलें !
आणि चित्त भारलें
लोभलें कितीक दीस त्यांत आपुल्या घरीं
अन्तरीं कुणी शिरे
चित्त होय बावरें
थाम्बवी परन्तु वेड हीच गीतबांसरी
सूर आज नादले
दारिं तोंच पातलें
अन् कुणीं, कसें, कळे न आणिलें इथें वरी !

काय मोहवी असें
गीत लावुनी पिसें
ठाउकें न झङ्कृती मदीय ही कृती करी !
चारुशील देवते
भगिनि, गानमोहिते !
बन्धु मी, असाच लोभ अन्तरीं सदा धरी

कोण तूं०

परत त्याच पावलीं
मुन्दरीच परतली
अश्रुबिन्दु ठिबकले, जणूं जिव्हार भूवरी

फोडिली तयें विणा
आवरूनिया मना
ध्येयमग्न तो कुठे निघून जाय सत्वरीं

शान्वलें समोरलें
परि न गीत आंतलें
आणि हाय ! ती अखेर करपली निजान्तरीं !

११ आगस्ट १९२४ पुणें

# ९४ दोन पातकी

[ सारख्याच अपराधांबद्दल न्यायदान करतांना स्त्रीपुरुष हा भेद कसा केला जातो, याचें चित्र या कथेंत आहे. ही कविता सुप्रसिद्ध कवयित्री इला व्हीलर विलकॉक्सच्या 'टू सिनर्स'चें रूपान्तर आहे.]

[ जाति–साकी ]

१

तशीच होती सुन्दर त्याची तारुण्याची कान्ति
त्यांत सम्पदा स्वच्छन्दानें खेळत होती हातीं
शीलमन्दिरा आग लावि तो मोहुन रसरङ्गेला
मोहरलेला पूर्णचन्द्रमा झणीं कलङ्कित झाला !
"दिवस चार हे अशा मजेचे ! असेंच चालायाचें,
अङ्गाङ्गांतुन मुसमुसलेलें यौवन जेव्हां नाचे !"
बोलुनि ऐसें त्याच गांवचे करुन करुन शिणलेले
करीत होते कौतुक त्याचें सभ्य कुणी पिकलेले
आणि एक दिन अन्नाला तो पुरा पारखा झाला
धुन्दी जाउनि कृतकर्मांचा डोङ्गर दिसला त्याला
पश्चात्तापें जळूं लागलें अन्तर आणिक पाप
मिळूं लागली हळूहळू मग हृदया शान्ति अपाप
मुखीं शारदा नाचे; लक्ष्मी लोळण घेई पायीं
शास्त्रीपण्डित वदती 'ऐसा थोर महात्मा नाही !'
धनवन्तानें कुणी सुशीला अर्पुनि अपुली बाला
आणि जनांनीं फुलें उधळुनी, गौरविलें मग त्याला !

कुलशीलवती अशीच दुसरी कोणी बाला होती
तारुण्याची कान्ती म्हणजे केवळ शुक्री मोतीं
पावित्र्याची, प्रेमळतेची, सहृदयतेची देवी
तिला जगाची वरची माया ठाउक असणें केवि !
विनोदशीला, रूपमोहना, अल्लड, भोळी बाला
प्रेमाभासें अवचित फसली शब्दशृङ्गाराला
एकजिवानें, एकमनानें प्रेमें वरिलें ज्याला
तोच महात्मा कुमारिकेचा गळा कापुनी गेला !
पश्चात्तापें जळलें अन्तर, गळल्या अश्रूधारा
मातापितरीं केला तिजवर दुर्वचनांचा मारा
शास्त्रीपण्डित थकले चाळुनि धर्मसिन्धुचीं पानें
धिक्काराविण धर्म न दिसला ! जनता तर अवमानें !
प्रकाश दिसला तिला न; कैसें विदुषीपण लाभावें !
मागणीस ही यावें त्यानें जनवचनीं परतावें !
असाच कोणी एक सुधारक आला, आणिक गेला !
आणि तिनें मग हळूच रात्रीं आड आपुला केला !

२० डिसेम्बर १९२४ पुणें

# ९५ अन्धारांतील बाण

[ज्या बाणानें विद्ध झालों असतां आपण हळहळतों, तोच बाण, आपली जसजशी हाल्याबर, आपण बेलाशक दुसऱ्यावर सोडतों, हीच या कथेंतील कल्पना.]

[ जाति—साकी ]

मग थाटानें विवाह त्यांचा अतुल साजरा झाला
आणि तयांच्या उरला नाही पारच आनन्दाला
ज्यानें त्यानें बघुन तयांना कुतुकें नांवाजावें
घरांतल्यांनीं प्रेमें त्यांचे कोड नवे पुरवावे
जिकडे तिकडे आनन्दाचें उठलें नव सङ्गीत
वाटे त्यांना 'विश्वामध्यें केवळ भरली प्रीत !'

परि एकानें वीष ओतलें जहरी त्याच्या कानीं
ढासळुनी तट गढूळ झालें एकाएकी पाणी
त्यजुनि तियेला, माहेराला मग पोंचवितां त्यानें
हितशत्रूंच्या हृदयीं उकळ्या फुटल्या आनन्दानें
कुणि सासूला, कुणी पतीला, तिला निन्दिलें कोणीं,
कण्ड्या उठल्या भलभलत्या; मग हृदय विद्धलें बाणीं

पूत मनानें आणि गुणानें जरी राहिली बाला
जननिन्देचा घाव भयङ्कर सहन न तिजला झाला
व्याकुळुनी मन धावूं लागे सहानुभूतीपाठीं
करुण वचानें विनवी देवा पतिच्या पायासाठीं
वाटे तिजला –'हाय बोलती भलभलते जे बोल
न कळे त्यांस कसें ते चुरती परहृदयाचें फूल !'

अशा परीनें जरा तावलें भट्टीमध्यें सोनें
आर्त सतीची हाक ऐकिली प्रेमळ परमेशानें
कुणास ठावें कसें जाहलें ! पति येउन चरणाशीं
कृतापराधक्षमा याचुनी धरि तिज बाहुपाशीं
आणि गाइली सुरेल त्यांनीं संसाराची नान्दी
अर्धतोडली सङ्गत झाली वृक्षासङ्गें फान्दी !

दिवस लोटले, तत्संसारा बहार आला पूर्ण
चढत्या विभवीं पूर्ववेदना विस्मरली ती तूर्ण
त्याच सुशिक्षित नगरीं कोणी दुसरीं हृदयें दोन
प्रीतिभरानें परस्परांचे भरती आन्तर कोन
सुरलोकींची रतिमदनांची, लैलामज्नूनांची
उषानिरुद्धांच्यासम म्हणती प्रीति निर्मल त्यांची

परन्तु केली याच सतीनें जननिन्देवर ताण
अचुक मारिला दुर्वचनांचा तीव्र विषारी बाण
मर्मीं बसुनी घाव जाहली त्यांतिल ती घायाळ
करपवुनी तिज टाकी, निष्ठुर पेटविलेला जाळ !
बोले मग तो 'हाय, बोलती मलमलते जे बोल
न कळे त्यांस, कसें ते चुरती परहृदयाचें फूल !'

१ एप्रिल १९२६ पुणें

# ९६ दोन रमणी

[ दुक्खमय जीवन सदाशांनीं थोडें तरी सुखमय होतें; निदान निराशें-तून आशेकडे जाण्यांत एकप्रकारचा श्रेयस्कारक पुरुषार्थ तरी आहे; हीच कल्पना पुढील कथेंत रङ्गविली आहे]

[ जाति-पादाकुलक ]

वहात होता पहाटवारा   आसमन्त डोलवुनी सारा
अङ्ग झाडुनी रान हाललें   जागीं झालीं कम्पित सलिलें
आरुण रङ्गीं फुलें रङ्गलीं   वाऱ्यावर तीं स्वैरत गेलीं
फान्दीमधुनी किल्‌बिल् कोणी   ओढ्यासङ्गें गाई गाणीं
केव्हा झुळझुळ, केव्हा खळखळ   सुखदुक्खांचीं गाणीं मञ्जुळ
ओहळ गाई खडकाळींतुनि   उदयोन्मुख तेजानें नटुनी

बाजुस इकडे दरी भयङ्कर   समोर तिकडे डोङ्गर सुन्दर
काळखाइ ही खाया उठली   हिरवळ तिकडे निळसर नटली
कड्याखालती काळोखानें   दाट कोन्दलीं काळीं रानें
खोल खोल भयकर अन्धारीं   बघतां नयना ये अन्धारी
पाचूमाणिकनीळमण्यांनीं   समोर चमके टोंक नभांतुनि
दरींत तर वाकुन बघवेना !   सुन्दरतेवर नजर ठरेना !

तों अन्धाऱ्या दरींतुनी वर   ये रडण्याचा बेसुर सूर
वच कानीं ये ओढ्याकाठीं   'जिवास कां या आटाआटी !'
विलापिकेची ही शब्दावलि   विरत विरत वाऱ्यावर गेली
कानीं परि शब्दाभासांनीं   'गुं गुं' होतें विलपत कोणी
ताम्बुस गगनांतुन तों आले   बांसरिचे स्वर टोकावरले
'अनन्त साऱ्या आटाआटी   सौख्याच्या निमिषैकासाठी !'

चित्त भडकलें वाऱ्यावरती लाटा उठल्या लाटावरती
गुङ्ग जाहली मती, कळेना ! भिडली आकाशास कल्पना
ठरली दृष्टि जळावर शान्त सरलीं विश्वें पुढुन अनन्त
शब्द दरींतुन पुनरपि आले तेंच बांसरीस्वर उत्तरले
शान्त जळीं तों खळबळ झाली लाट रुपेरी वरती आली
बोले येउन पाण्याकाठीं– 'सौख्याच्या निमिषैकासाठी !'

भिरभिरुनी मन, बोले जिभली अपुल्याशीं जी केवळ रमली
'जाळिति जीवा किती निखारे एकच बिन्दुस्तव हें सारें !
प्रिय शब्दास्तव दुःशब्दांची सहतों लाखोली जगताची
संसाराच्या फोलपणाचे तुकडे जपतों, गणुन हिऱ्याचे
अमित तटवितों आंत उमाळे त्यांत शोधतों परी जिव्हाळे
'जीवाच्या या आटाआटी सौख्याच्या निमिषैकासाठी !'

तुफान सागर जरी खवळला स्नेहें सजतों शान्तविण्याला
फुटकें तारू मनोरथांचें घेउन आम्ही जीवनधींचें
तरण कराया वेडें सजतों अनन्त लाटा खातों, पडतों
तळिंचे म्हणुनी दिव्य शिम्पले धरितों बुद्बुद फेसावरले
चहुबाजूंनीं कठोर मारा गाठूं म्हणतों तरि हि किनारा
जीवाच्या या आटाआटी सौख्याच्या निमिषैकासाठी

काजळलेली, अवकाळानें
मृगजळ पाजवि जों रवि त्यांना
पिकें पिकवितों अश्रुसरींनीं
उन्च केवढी होइल रास
तोंवर कष्टुन, कधीं उपाशी
जीवाच्या या आटाआटी

सुकून जातां सुन्दर रानें
करीं रुजवितों तों बीजांना
निःश्वासाच्या वाफाऱ्यांनीं
मळल्यावर, हा धरितों ध्यास
बघतों बीजांमधेंच राशी
सौख्याच्या निमिषैकासाठी !'

बोलत होतों असें कायसें
बिलगून हळू कराङ्गुलींनीं
वळून बघतां, खोल दरींतुन
दृष्टि वळवि मम, दावुनि काही
रूपवती तों तेथे कोणी
दिसे बैसली वाजवित स्वर

तोंच मागुनी खान्द्यासरिसें
स्पर्शी कोणी उदास रमणी !
दिसली आलेली मज लगटुन
डोङ्गरटोकावर बोटांही
गुलाबपातळ नेसुन तरुणी
मोहकतेनें भारुनि अम्बर !

तों ती सुन्दरि बोले मजला
नभाकडे वर दावुन बोले
क्षणात उठलों, जाया सजलों
पांखरिच्या चालत तालावर
अर्धपथांतुन बघतां खाली
'जीवाच्या या आटापाटी

'ये ये वर घेउनि भगिनीला!'
'हें बघ वरलें दार तुज खुलें !'
एकामेकां धरुनि निघालों
चढूं लागलों डोङ्गर वर वर
लाट रुपेरी तीच बोलली
सौख्याच्या निमिषैकासाठी !'

११ आक्टोबर १९२२ रहिमतपूर

# १७ बकुळा

[जाति—स्वर्गङ्गा]

हिरवी झाडी मुळामुठेच्या दोहितटांवर ही दाट
इकडे पेरूबाग आणखी तिकडे मळयांचा थाट
सङ्गमलेला ओघ नद्यांचा गभीर हा मधुनी वाहे
रानफुलांचा पाणवेलिंचा वास तटीं दरवळताहे
आषाढाच्या सरी लागल्या; रिपरिपली वरुनी धार
रात्र पसरली घोर; भोवती भयाण पडला अन्धार !
झाकळून हें आलें पुरतें; काजळ आकाशा वेढी
वरती तारे आणि खालती गाढ झोपले नावाडी
वस्त्र फाटकें अङ्गावर, परि काचा कसुनी ही धीट
नावाड्याची पोर चालली बकुळा अन्धारीं नीट
खुण्टवलेली नाव सोडुनी तिनें ढकलली पाण्यांत
वीज कडाडे ! मेघ पातले अपुल्या ताण्डवगाण्यांत
वरती भवती पाहुन वल्हें आवेगानें ती मारी
भायाण पाण्यामधुनी नौका चालुन, भिजली सुकुमारी
अन्तर्यामीं घोर निराशा, खळबळ जङ्गी जरी चाले
कौशल्यानें जळांत वल्हें तरुणीचें तरि ही हाले
काळोखानें जरी ग्रासिलें पाण्यामध्यें चहुकडुनी
प्रीत दाखवी मार्ग आपुला विद्युद्रूपें कडकडुनी
सर सर पाणी काटुन नौका अचुक लागली पैलथडी
चिम्ब उराशीं हात घेउनी बकुळा राहे उभी खडी !
'उटा चन्द्रुजी ! उटा बिगिबिगि !' करुण हाक मारून अशी
हळूच उठवी कोपीमधला ती प्रिय अपुला जीवशशी
डोळे चोळुन, बघतां त्याला दिसली गडणी भिजलेली
डोक्यावरली धार अजूनी निथळत होती भूमितलीं

'कोन बकूळे !—इकत्या रातीं ! चे, पाङ्गर घ्वाङ्गडि आदी !'
'थाम्बा माज्या जिवा !' बोलली गहिवरुनी वाणी साधी
'दूर जरा व्हा ! बकुळा न्हाई तुमची ! बोला दुरुन् मशीं !
लगान पर्वा; शेवटची म्हुन् आल्यें भेटायास अशी।'
कण्ठ दाटुनी मुसूंमुसूं ती रडूं लागली गहिवरुनी
धार गळाली ! स्तब्ध चन्द्रुजी झाला हृदयीं हळहळुनी !
'जाउं नगं तू काकडलेली ! न्हआ !'—'चन्द्रुजी ह्यें काय !
अबरू अपुली अन् बाची बी—नगं—सोडत्यें ह्ये पाय !'
वीज कडकडे पुन्हा अम्बरीं वळली बकुळेची पाठ
स्तिमित होउनी परि तो राहे तिथेच अन्धारीं ताठ
मुसळधार तो पडूं लागली डोक्यावर त्याच्या धार
शून्य मनानें परि तो राहे सोशित जलदाचे वार
पुन्हा नदीच्या अथाङ्ग पात्रीं वीज कडाडे चमकून
क्षणैक नौका पुरांत दिसली खालीवर हेलावून
लाटावरती लाटा येउन फुगलें जळ अपरम्पार
अन्धारांतुन डोक्यावरती बसला बाणांचा मार !
मयाण पात्रांतील भोवरे चुकवायाला अन्धारीं
दोहातांनीं वल्हीं मारुनी बकुळा थकलीं मग भारी
हातामधली गळली शक्ती नाव लागली धारेला
गर गर गोते खाया लागे, धीर तिचा न जरी खचला
उपाय हरले अखेर सारे, सावरण्याला नच वाव
एकच उठला शब्द—'चन्द्रुजी !' आणि जळीं बुडली नाव !
रम्य कोवळे किरण सकाळीं रविनें खाली पाजळले
भिउन पित्यानें, गडी आपुले शोधाया तिज पाठविले !
हाय ! कलेवर चन्द्रोजींचें दिसलें एकाला रानीं
आणि भवतिचीं हिरवीपिवळी झाडी भिजली अश्रूंनीं !

३१ डिसेम्बर १९२५ सोलापूर

## ९८ लक्ष्मीपूजनाच्या सायङ्काळीं

[ सुनीत ]

राहे एक तमिस्र पूर्ण भरुनी, अन्धारता भोंवती
  नेत्रा कातळ ही दिसे न; हृदयीं खिन्नत्व आलें असें
खाली मात्र पुरींत दीप, वरती तारा नभीं हासती
  गेली लोपुन अन्य सृष्टि ! नयना भव्यत्व कांही दिसे
अन्धारांतुन बाण तों सरसरा आले वरी नाचत
  एकामागुन एक सर्व भवतीं नाचूं उडूं लागती
कारञ्जीं जणु अग्निचीं उडविलीं, वा कल्पना धावत
  घेती पेट उचम्बळून कविच्या, कीं जीव उन्मावती;
आकाङ्क्षा मनिंच्या जळून जग वा जाळावया धावती
  येती सर्व विझून कृष्णमुख ते खाली पडाया क्षणीं
जीवांनीं कलहानलीं क्षणभरीं चेतून ऐशी गती
  घ्यावी, यापरतें न साध्य कसलें आम्हांस कालेक्षणीं !
काव्याच्या तरि गर्व कां मग मनीं हा आपुल्या वाहणें !
  आम्ही पेटुन बोललों क्षण, तरी कालें जिथे रक्षणें !

१० नोव्हेम्बर १९२३ पुणें

## ९९ गाणाऱ्या मोहिनीस

[ जाति–मोहिनी ]

सोड सोड आता अपुल्या गोड मोहिनीला
मधुर गान ऐकायाला जीव हा भुकेला ॥ ध्रु० ॥

जोड नको सारङ्गीची साथ द्यावयाला
नको गडे वीणेवरती फिरवुं अङ्गुलीला
सूर नको, ठेवी खाली ठेव सतारीला
एकतार ही बोलेना ऐकुनी सुराला !

विश्व एकदा भरलें हें गोड लकेरीनें
मूक पांखरें मग झालीं; मूक जीव, रानें–
गान एक ऐकायाला बैसलीं मनानें
गोड गोड कुणि जादूनें भुलविलें जगाला ?

एकतार ही हृदयाची गोड तुझ्या वाटे
एक तार पावित्र्याची तीजवरी थाटे
प्रेमरूप झङ्काराची तींत तान दाटे
एकरूप करिं जीवाला, सूर तुज कशाला !

२३ जानेवारी १९२१ पुणें

## १०० अर्घ्यदान

[ अभङ्ग ]

‘पत्र पुष्प फळ तोय भक्तिभावें
समर्पितां व्हावें प्रिय मातें’
हीच वाणी तुझी जिवा दे आधार
म्हणूनी साचार आलों पायां
अवगाहोनीया काव्य-गङ्गेमाजीं
अञ्जली हा आजीं घेतलासे
अश्रूंचीं काञ्चन-फुलें, भावगन्ध
घालूनी सानन्द तयामाजीं
अर्घ्य तुझ्यासाठीं भक्तिपोटीं केला
येईल हाकेला, आसावलों
थेम्बें थेम्बें जळ झरे किती वाटा
कुठला मी साठा देऊं मग !
कुठवर पाहूं तिष्ठत मी वाट ?
नको दावूं पाठ मज आता
येई लागवेगें, सेवी अर्घ्यदान
नको मज आन, कनवाळा !

१४ मार्च १९३० पुणें

# शीर्षकांची सूची


| | |
|---|---|
| अर्घ्यदान | १४४ |
| अन्धारांतील बाण | १३५ |
| अनाथ बालिकाश्रमांतील | |
| आरंभीची खोली | ३८ |
| आत्मनिवेदन | १३ |
| आभार | १२१ |
| उपरति | ११७ |
| ओढणी | ११४ |
| ओलावा | १०९ |
| कविकातळ | ३६ |
| कवितेचा जन्म | ५ |
| कृतज्ञता | १२३ |
| खेळ | १० |
| गाणाऱ्या मोहिनीस | १४३ |
| गानमोहिता | १३० |
| गोड आठवण | ७० |
| गोपाळ कृष्ण गोखले | ४१ |
| गोफ | ९८ |
| जागेपणचें स्वप्न | ६३ |
| झुकलेली नौका | ९२ |
| झोका | ११ |
| टाकलेली | ५५ |
| तळमळ | १०२ |
| ताईच | २१ |
| तुझ्यावांचून | ८१ |
| तुझें औदार्य | ११२ |
| देवि क्षमे | ९७ |
| दोन देवी | १२५ |
| दोन पातकी | १३३ |
| दोन रमणी | १३७ |
| ध्यान | १०८ |
| ध्यास | ८० |
| धुक्यांत | ९६ |
| नरकचतुर्दशी | १४ |
| निजलेल्या वसन्तास | ४२ |
| निशाणरोवणी | ४५ |
| पडलेल्या ताऱ्यास | १६ |
| परित्यक्ता | ५३ |
| पलीकडे | ७८ |
| पाठीराखा | ११६ |
| पाय घसरला तर | ५७ |
| पितृस्मृति | १५ |
| पुण्यपुरीस | ३३ |
| पूर्णेन्दू | ६६ |
| प्रेमसुधा | ११३ |
| बकुळा | १४० |

| | |
|---|---|
| बहाणा | ६४ |
| बालगन्धर्व | ४४ |
| भयाण समुद्रांत | १०१ |
| भलरी | ४८ |
| भावाचे अश्रु | ५६ |
| भास | ८४ |
| भेटवस्तु परत आल्यावर | ७३ |
| भेटीनन्तर | ७१ |
| मधुरमीलन | ८५ |
| मनाची आग | १०० |
| मनीषा | १२२ |
| माझीं माणकें | १२६ |
| मावळ्यांचें गाणें | ४६ |
| मातृप्रेम | २४ |
| माहेर | ११५ |
| मुरली | १०४ |
| मूकसङ्गीत | ९४ |
| मैत्रीचें सिंहावलोकन | २१ |
| यशस्वी कोण | ९५ |
| याचना | १०५ |
| लक्ष्मीपूजनाच्यासायङ्काळीं | १४२ |
| लाजविलेला गुलाब | ६९ |
| वनदेवीचें गाणें | २५ |
| वनवासी | ७४ |
| वादळ | ६८ |
| वारेपाऊस | ५० |
| वियोगिनीचें पुण्यस्मरण | ७६ |
| विरहिणी | ७५ |
| विश्रामबागेजवळ | ३४ |
| विश्वकमल | १ |
| विसरलेला नमस्कार | २२ |
| विसावा | ११९ |
| वृद्ध भटजी | ८७ |
| वैराग्य | ११८ |
| शनवारवाडा | ३९ |
| शान्तिस्थान | २८ |
| श्री शारदावन्दन | २ |
| शूर्पणखा | ८६ |
| सप्तर्षि | १२ |
| संभ्रम | १११ |
| समर्थांचें चापळ | ३१ |
| समाधान | १२० |
| सरस्वती | ७२ |
| स्वरमोहिनी | ८३ |
| संशयरत्नमाला | ८९ |
| संसारवन | १०७ |
| सूरसङ्गिनी | ८ |
| सारङ्गीवाला | ३ |
| स्थानभ्रष्ट फुलास | ७ |
| सुनीत | ६ |
| सौभाग्य | १२७ |
| हृद्गत | ६७ |
| हृदयदान | ७९ |
| हुरहूर | ११० |
| क्षणाचाच विलम्ब | १२९ |

# पहिल्या ओळींची सूची


| | |
|---|---|
| अजून हा ओढी जिवा गोतावळा | ११५ |
| अनन्त काळाचा अफाट हा सिन्धु | ११८ |
| आता कळों आलें तूच एक वाली | १२० |
| आली शारदसुन्दरी सजुनिया, वाहून आलाविती | १४ |
| आलों पुण्यपुरीहुनी बहुदिसां, गांवाकडे चाललों | १५ |
| उन्मन व्हावें, व्याकळून त्यांतच जावें | १०२ |
| उन्हाळ्याची ती ऐन भर दुपार | १२७ |
| एकच शान्तिस्थान । मला तूं । एकच शान्तिस्थान | २८ |
| ओढे त्या धरणावरी खळखळा वाहात होते वनीं | ७४ |
| कां उठतां ? खालीं बसा तरुणमण्डळी | ८७ |
| काटे कुटे रानीं किती या माजले | १०७ |
| कां विटलें मन माझ्यावरति, राजसे ? | ७३ |
| कासया हें डोळां दाटतसे पाणी | ११९ |
| किती करूं आळवणी कधीं येई करुणा मनीं | १०५ |
| किति करूं विनवणी तुज आता | ५३ |
| किति दिन गेलों तुज विसरून | ११७ |
| किति दिन लागे ध्यास तुझा, व्याकुळलें फार | ८० |
| किति मानसीं मीं आभारावें तुला | १२१ |
| कुठे आम्ही चाललों ? वरी-खालीं ? | ३४ |
| कुठे जन्मासवें आणिलीं मीं होतीं | ११४ |
| कुणाचा मी कोण मनास विचारी | ११६ |
| केव्हा येशिल तू म्हणोनि बघतों मी वाट रात्रन्दिनीं | ७१ |
| कोण तू कुठून येसि कां हळूच मन्दिरीं | १३० |

खेळ चाले भोवताली आनन्दाला येई पूर ८१
गळ्यांत कर टाकुनी चिमुकला, मला बान्धुनी ४२
गेलें तुझ्यावर जडून । रामा, मन गेलें तुझ्यावर जडून ८६
गोड गानीं मोहिनीनें भारिसी तू गायका ४४
घे आतर ने मज परतीरा ७८
चल, निशाण धर हें करीं पुढे चल नेटानें वरिवरीं ४५
चला रायगडा शिवरायाचं दर्सन घेवूं ४६
चला चला ग पाण्याला २५
छाया तरूंच्या किती रङ्गलेल्या तुझ्या भोवतीं थाटुनी राहती २
जाईना ही काय करूं जळजळ १०९
जाताना चरणावरी शिर तुझ्या ठेवीन हें योजिलें २२
जिथे जिथे स्वर तुझा ऐकतों मन तेथे रमतें ८२
जीवाची रमणीयता हरपली मुम्ताज जीवेश्वरी ६
झोका घेऊं या ग झोका देऊं या ११
ठेविलें दारीं न जों पाऊल तूझ्या, मञ्जुळे ७०
तरङ्गुनी अम्बरीं ऊठ ये तरङ्गुनी अम्बरीं ९८
तव भास अन्तरा झाला, मन रमतां, मोहना ८४
तव मूर्ति बघूं मी कुठे मधुर हासरी ७६
तशीच होती सुन्दर त्याची तारुण्याची कान्ती १३३
'ताई तूं, तव बन्धु मीहि' अपुरें नातें गमे हें मना २३
तुझ्या औदार्यास नाही पारावार ११२
तुझ्या विच्छिन्न रूपाला बघूनी फाटतो ऊर ३९
तुझि ग फुलवेल । या अम्ब्यावरति फुलेल ६३
तुझि मुरली मधुर मुकुन्दा मज ऐकूं दे जरा १०४
तुझी प्रेमसुधा जगा जिववितें ११३

तुझें रूप डोळां सदा आठवावें १२२
तुफान दर्या आयुष्याचा खवळुन गेला अस्मानीं ९२
तू येणार म्हणून लोचन तुझ्या मार्गाकडे लागले ६७
तेव्हां रम्य उषा ! जरा उमलली कोठें जिवाची कळी २१
तेव्हा क्षुब्ध दिशांमधूनि निघती निन्दापमानध्वनि १३
दर्या हेलावुन फेसाळे ! अन्धारुन अम्बर गेलें १२५
दान केलें एकदाचें हृदयाचें जीवेभावें ७९
दृश्यें सुन्दर हीं अनन्त दिसतीं, वाटे धरूं कोणचीं ५
दुर्दैवी भगिनी समोर निजली खाली बिछान्यावरी ५६
निःस्वार्थी तव पाहुनी रसिकता श्री शारदामन्दिरीं २४
धीरोदात्त तुझी अजून हसरी मूर्ती पुढें खेळते ४१
पत्र पुष्प फल तोय भक्तिभावें १४४
प्रीति खरी मजवर तव हें काय मज कळेना ! ६४
प्रीतीची तुझ्या लागे जिवाला लागणी घोर ६६
पोर खाटेवर मृत्युच्याच दारा १२३
बघ चान्दोबा आई, पहा ! डोङ्गर थोर १०
भलरी घाला चला गड्यांनो भलरिचं गा गीत ४८
'भेटीनें विरसें कसें मन ?' असें चित्तीं उठे काहुर ७२
मग थाटानें विवाह त्यांचा अतुल साजरा झाला १२५
मज चैन नसे ग कशि मी रिझवूं मना ! ७५
मधुर तुझें प्रभु चरण नमावें १
मधुर विमल हृदयीं कैशी चन्द्रिका उदेली ८९
मन किती बघुन तुज कौतुकतें ३८
मनमोहन वाजवुनी सारङ्गी काढी मञ्जुळ सूर २
माफी मजला करा दयाळा ५९

ये हळू जपूनच ताई ५७
रानें, डोङ्गर, भोवतीं हिरवळी, ओहोळ उन्चावरो १६
राहे एक तमिस्त्र पूर्ण भरुनी, अन्धारतां भोवतीं १४२
रिझवाया मन व्याकूळ एकटा १११
लावि जिवा वेड तुझी गोड गानबांसरी ८
लिहितां बहु त्वरेनें 'लिहितां कोणास ?' हें तुम्हां देवी ८९
वहात होता पहाटवारा १३७
वाटे मनांत संनिध यावें तुझ्या जरी ३६
वारे पाउस गात । गाऊ या । वारे पाउस गान ५०
विद्यार्थी असतां करीं तव दिलें प्रेमें पित्यानें मला ३३
शिरीं धोण्डा लागून जखम झाली १२९
शून्य झालें मनीं ! शून्य झालें जनीं ! १६
शुक्राची नव हेमकान्ति दिसते अस्ताचलीं मोहक १२
सहज त्यानें भाण्डार दाखवीलें १२६
सन्ध्या ताम्बुस रङ्गली, विलसली शोभा वसन्तीं नवी ७
संसार तापानें जीव जधीं पोळे १०८
संसारार्णववीचि घोर उठल्या, वेगांत हेलावल्या ९५
स्वार्थी ठेवुनि घोर दृष्टि अपुल्या सद्बुद्धिला जाळुनी ९७
सुरम्य भगवी ध्वजा वघुनि ही तुझी लाम्बुनि ३१
सूर नको, शब्द नको, थाम्बुंदेत गानें ९४
सोड सोड आता अपुल्या गोड मोहिनीला १४३
सों सों वाहुन वात भीषण जवें घोङ्घावया ६८
हा हाय ! कुठे जाऊं ! डोळ्यांस दिसेना तीर १०१
हिरवी झाडी मुळामुठेच्या दोहि तटांवर ही दाट १४०
ही आग पेटलेली माझ्या सभोवताली १००
होतसे कां ऐसें चुकल्यासारखें ११०
होती साञ्ज दुरून मार्गि मजला प्रेमें गवाक्षांतुनी ६९

## रविकिरणमण्डळाचीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १ | किरण (गद्यपद्य, मण्डळ) | ०४ |
| २ | काव्यविचार (काव्यविषयक निबन्ध, मण्डळ) | १ |
| ३ | उषा (पद्य, मण्डळ) | ०१२ |
| ४ | मधुमाधव (पद्य, घाटे–माधव जूलियन्) | ०१२ |
| ५ | शलाका (गद्यपद्य, मण्डळ) | १ |
| ६ | विरहतरङ्ग (खण्डकाव्य, माधव जूलियन्) | ०८ |
| ७ | कला (खण्डकाव्य, गिरीश) | ०६ |
| ८ | नाट्यरूप महाराष्ट्र (ऐतिहासिक प्रवेश, विठ्ठलराव घाटे) | १ |
| ९ | छन्दोरचना (मराठी वृत्तशास्त्र, प्रो. मा. त्रि. पटवर्धन) | २ |
| १० | प्रभा (गद्यपद्य, मण्डळ) | ०८ |
| ११ | सुधारक (खण्डकाव्य, माधव जूलियन्) | १०८ |
| १२ | आम्बराई (खण्डकाव्य, गिरीश) | १ |
| १३ | यशोधन (पद्य, यशवन्त) | १०८ |
| १४ | उमर खय्यामच्या रुबाया (पद्य, प्रो. मा. त्रि. पटवर्धन) | १०८ |
| १५ | भावमन्थन (पद्य, यशवन्त) | ०८ |
| १६ | काञ्चनगङ्गा (पद्य, गिरीश) | १०८ |

## मण्डळाचीं पुढील पुस्तकें

१७ मनोरमा ( पद्य, कै. सौ. मनोरमा रानडे बी.ए. )

१८ मधु-लहरी ( पद्य, माधव जूलियन् )

१९ अभागी कमल ( खण्डकाव्य, गिरीश )

सुंदर बांधणी
सुबक छपाई

# दूर्वांकुर

किं. ८आणे.
पो. ख. ०१ आ.

## कवि गोपीनाथ यांच्या सुंदर कवितांचा संग्रह.

"गोपीनाथ यांच्या काव्याचें अंतरंग अकृत्रिम असल्यामुळें त्यांची कविता सहृदय वाचकांस आदरणीय वाटल्यावांचून राहणार नाहीं"—**ज्ञानप्रकाश.** "त्यांची भाषा साधी, सरळ व मनोवेधक आहे"—**नवा काळ.** "या संग्रहांतील कविता मृदु-मधुर असून, मराठी काव्यवाङ्मयांत या दूर्वांकुरामुळें चांगली भर पडली आहे यांत शंका नाहीं."-**महाराष्ट्र.**

सुप्रसिद्ध टीकाकार **श्री. ग. त्र्यं. माडखोलकर** यांची प्रस्तावना.

**पत्ताः—आनंदकार्यालय, पुणें.**

---

# बालशारदा

## (संग्राहक—गणेश हरि पाटील)

हा काव्यसंग्रह मुलांकरितां आहे. मुलांचें मनोरंजन होईल, त्यांच्या नैसर्गिक अभिरुचीला पोषक असें रम्य काव्य सहजासहजीं मुखोद्गत होईल. आणि नादमाधुर्याची गोडी लागून खऱ्या काव्यगुणांची आवड त्यांच्यांत उत्पन्न होईल अशा दृष्टीनें ह्या छोटेखानी काव्यसंग्रहांत सुंदर व सोप्या कवितांचें संकलन केलें आहे. केशवसुत, टिळक, गोविंदाग्रज, तांबे, बालकवि इ० प्रख्यात आधुनिक कवितेच्या रसाळ कवनांनीं नटलेला हा संग्रह मुलांच्या हातीं देण्यास सर्वथैव योग्य असाच आहे. आर्टपेपरवरील दोन सुंदर चित्रें दिलीं असून पुस्तकारंभीं उद्बोधक प्रस्तावना जोडली आहे. छपाई फारच सुंदर. किं. ८ आणे ट. ह. शिवाय.

**पत्ताः—ग. ह. पाटील**
२७२ सदाशिव पुणे.